महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ३९, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २४ डिसेंबर २०२४ ते सोमवार ३० डिसेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### 'एक देश, एक निवडणूक' २०३४ पूर्वी अशक्य !

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

गेल्या वर्षी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने सुचवलेल्या शिफारशीनुसार, दोन विधेयके लोकसभेत नुकतीच मांडण्यात आली. लोकसभेत 'एक देश, एक निवडणूक' विधेयक मंजूर झाल्यानंतर देशभर याच विधेयकाची चर्चा आहे. मात्र



'एक देश, एक निवडणूक' २०३४ पूर्वी घेणे एक देश, एक निवडणूक घटनादुरुस्ती विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे सुधारणा विधेयक २०२४ ही दोन विधेयके केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी १७ डिसेंबरला लोकसभेत सादर केली. या विधेयकांना बहुमताने मंजुरी मिळाली असून त्यामुळे देशात एकाच वेळी निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, एकाच वेळी सर्व निवडणुका घेण्यात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार, 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण २०३४ मध्ये लागू केले, तर दीड लाख कोटी रुपये फक्त ईव्हीएम खरेदीसाठी खर्च होतील. त्याचबरोबर एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी केंद्रीय सुरक्षा दलात ५० टक्क्यांनी वाढ करावी लागेल.

### ५ वी आणि ८ वीतील विद्यार्थ्यांना सरकरट उत्तीर्ण करण्याचं धोरण रद्द!

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

यापुढे सातवी आणि आठवीतही विद्यार्थ्यांना परीक्षेत पास व्हावं लागणार आहे. परीक्षेत कमी गुण मिळाले तर विद्यार्थ्यांना त्याच वर्गात बसाव लागणार आहे. केंद्र सरकारने याबाबत आज मोठा निर्णय घेतला असून ५ वी आणि ८ वीतील विद्यार्थ्यांना सरकरट



उत्तीर्ण करण्याचं धोरण रद्द केलं आहे. विद्यार्थी परीक्षेत नापास झाले तर फेरपरीक्षा घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. जर त्यामध्येही विद्यार्थी नापास झाला तर त्याला त्याच वर्गात बसावं लागणार आहे. आरटीई कायद्यात हा महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. जे विद्यार्थी काही कारणामुळे अभ्यासात चांगले नसतात किंवा मागे पडतात त्यांच्यात सुधारणा व्हावी, हा या मागचा उद्देश आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांचं नुकसान करण्याचा उद्देश सरकारचा नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी आणखी काय करता येईल, यावर विचार करता येईल, असं केंद्रीय शिक्षण विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

# खातेवाटप झालं, आता पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच

## जिल्ह्यात ज्याचे जास्त आमदार, त्या पक्षाला पालकमंत्रिपद

■ मुंबई : विशाल कारंडे

विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला मिळालेल्या भरघोस यशानंतर एका महिन्याने राज्य मंत्रिमंडळ खातेवाटपासह आकाराला आले. आता तिन्ही पक्षातील मंत्र्यांमध्ये आपल्या जिल्हयाचे पालकमंत्रिपद मिळवण्यावरून रस्सीखेच सुरू झाली आहे. जिल्हयात ज्या पक्षाचे जास्त आमदार त्याला पालकमंत्रिपद असा फॉर्म्युला ठरल्याचे महायुतीतील सूत्रांनी सांगितले. काही जिल्हयांमध्ये पालकमंत्रिपदावर एकापेक्षा जास्त पक्षाच्या मंत्र्यांनी दावा सांगितल्याने याचे वाटप करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कसरत होणार आहे. निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागला. त्यानंतर १२ दिवसांनी ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी झाला. त्यानंतर १० दिवसांनी मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन ३९ मंत्र्यांचा शपथविधी पार पडला. खातेवाटपासाठी मंत्र्यांना ७ दिवस वाट बघावी लागली. आता खातेवाटप झाल्यानंतर मंत्र्यांना प्रतीक्षा आहे ती पालकमंत्रिपदाच्या वाटपाची. तीनही प्रमुख पक्षांमध्ये चांगला समन्वय आहे. खातेवाटपातही ते दिसले. पालकमंत्रिपदाची नावे लवकर जाहीर होतील. पालकमंत्रिपदावरून महायुतीत कुठलीही कुरबुर नाही, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

**कोणत्या जिल्हयांमध्ये अनेक इच्छुकांमुळे संघर्ष**

**रायगड :** रायगडमध्ये अजित पवार गटाच्या अदिती तटकरे मागील सरकारमध्ये पालकमंत्री होत्या. त्यावेळीच शिंदेसेनेचे भरत गोगावले हे आपण पालकमंत्री होणार असल्याचा दावा करत होते. मात्र त्यावेळी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. आता तटकरे आणि गोगावले दोन्ही मंत्री आहेत. रायगड जिल्हयात शिंदेसेनेचे ३ आणि भाजपचे ३ आमदार आहेत, तर अजित पवार गटाचा एकच आमदार आहे. गोगावले यांनी यावेळीही पालकमंत्रिपदावर दावा सांगितला आहे. तर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे जिल्हयावर आपली पकड कायम ठेवण्यासाठी अदिती तटकरेंना पालकमंत्रिपद मिळावे यासाठी प्रयत्नशील आहेत.

(शेष पृष्ठ ५ वर)

## ग्रामीण भागात गरीबांसाठी वर्षभरात १९ लाख ६६ हजार घरे देणार; केंद्रीय मंत्र्यांची घोषणा

■ पुणे : अभिजीत येरल्लू

किसान सन्मान दिवस २०२४ निमित्ताने पुण्यातील केंद्र सरकारच्या कृषी विज्ञान केंद्रात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपस्थित होते. भारताचे कृषी मंत्री आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरीबांसाठी मोठी घोषणा केली आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरे यावर्षी देण्यात



येणार असल्याची घोषणा चौहान यांनी केली आहे. यापूर्वी ६ लाखपेक्षा अधिक लोकांना घर मिळाली होती. १३ लाख २९ हजार महाराष्ट्रातील गरिबांना घरे भेटणार आहेत. आता महाराष्ट्राला जवळपास वीस लाख घरे आपल्याला मिळालेली आहेत. पुढील एका वर्षात ही घर भेटणार आहेत. ज्यांना यापूर्वी घर भेटले नाही, त्या सर्वांना स्वतःचे घर भेटणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधील महत्त्वाच्या अटी शिथील करण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील ज्या कुटुंबाकडे दुचाकी, मोटार नियंत्रित मासेमारीची बोट, लँडलाईन फोन आणि फ्रीज असेल त्यांना आता या योजनेचा लाभ घेता येणार आहे. याशिवाय ज्या कुटुंबातील एखाद्याचे मासिक उत्पन्न १५ हजार रुपयांपेक्षा कमी असेल त्यांना देखील अर्ज करता येईल. यापूर्वी ही अट १० हजार रुपये उत्पन्न एवढी होती. कार्यक्रमावेळी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान बोलताना म्हणाले, माझा महाराष्ट्राशी सखोल संबंध आहे. मी महाराष्ट्राचा जावई आहे. मी ग्रामीण विकास मंत्री देखील आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामीण गरीबांसाठी १९ लाख ६६ हजार घरे यावर्षी देण्यात येणार आहेत.

## वर्षभर काहीच प्रयत्न न केल्याने मुंबईतील हवेची गुणवत्ता वाईट स्थितीत

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

मुंबईतील विशेषतः उपनगरातील हवेची गुणवत्ता आणि दृश्यमानता दिवाळीपासून दिवसेंदिवस खालावल्याची उच्च न्यायालयाने शुक्रवारी गंभीर दखल घेतली. तसेच, स्थिती पुन्हा उद्भवण्यासाठी यंत्रणांना बजावण्यात आले होते. परंतु, मुंबईतील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असून वर्षभर काय केले? असा संतप्त प्रश्नही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या विशेष



महापालिका, राज्य सरकार, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची (एमपीसीबी) वर्षभर ठोस प्रयत्न न करण्याची निष्क्रियता जबाबदार असल्याची टीका न्यायालयाने केली. न्यायालय आदेश देईपर्यंत कोणालाच काही करायचे नसल्याचेही न्यायालयाने यंत्रणांना सुनावले.

गेल्या वर्षी वारंवार आदेश देण्यात आल्यानंतर मुंबईतील वायू प्रदूषणाची स्थिती नियंत्रणात आली. परिणामी वायू प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या बाबींवर घालण्यात आलेले निर्बंध शिथील करण्यात आले होते. वायू प्रदूषणाची स्थिती टाळण्यासाठी वर्षभर ठोस उपाययोजना करण्याचेही खंडपीठाने केला. त्याचवेळी, वाहतूक नियंत्रण व्यवस्थापनाचा अभाव किंवा चुकीच्या वाहतूक व्यवस्थापनामुळे मुंबईत त्यातही उपनगरांत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून ती वायू प्रदूषण वाढण्यास कारणीभूत ठरत असल्याचेही न्यायालयाने अधोरेखीत केले.

तसेच, परिवहन आणि वाहतूक विभागाच्या आयुक्तांनी उपनगरांतील द्रुतगती महामार्गांना भेट देऊन कशा प्रकारे नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येचा सामना करावा लागतो हे पाहण्याचे न्यायालयाने सुनावले.

(शेष पृष्ठ ५ वर)

## 'एक राज्य, एक गणवेश' योजना

### अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची

■ मुंबई : राकेश गायकवाड

'एक राज्य, एक गणवेश' या मोफत गणवेश योजनेची २०२५-२६ या नवीन शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. गडद निळ्या रंगाचा स्कर्ट तसेच ज्या शाळांमध्ये विद्यार्थीनींना सलवार-कमीज असा गणवेश असेल तर गडद निळ्या रंगाची सलवार व आकाशी रंगाची कमीज अशी असणार आहे. विशेष म्हणजे एक राज्य एक गणवेश' या मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची असणार आहे. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी मधील सर्व मुली, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्रयरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०२३-२४ च्या शैक्षणिक वर्षापासून राज्य योजनेतून प्रस्तुत योजनेचा लाभ दारिद्य रेषेवरील पालकांच्या मुलांना देखील देण्यात येत आहे. समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत तसेच, राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेंतर्गत सर्व पात्र शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून 'एक राज्य एक गणवेश' या संकल्पनेनुसार एक समान



आणि एक रंगाचा दर्जेदार गणवेश शासन स्तरावरून उपलब्ध करून देण्याच्या सूचना शासन निर्णय ८ जून २०२३, १८ ऑक्टोबर २०२३ व १० जून २०२४ अन्वये देण्यात आल्या आहेत. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये केंद्रीकृत पध्दतीने मोफत गणवेश योजनेचा लाभ देताना आलेल्या अडचणी, उद्भवलेल्या तक्रारी त्यानुषंगाने लोकप्रतिनिधी, शिक्षक संघटना इत्यादींनी मोफत गणवेश योजनेचा लाभ पूर्वीप्रमाणेच विकेंद्रीकरण पध्दतीने देण्यात यावा, अशी मागणी केली होती.

## हिंदुत्व आणि राममंदिराबाबत सरसंघचालक मोहन भागवत यांचे मोठं विधान

■ पुणे : अकिल शेख

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी हिंदुत्व आणि राममंदिराबाबत एक मोठं वक्तव्य केलंय. राम मंदिराची निर्मिती व्हावं असं हिंदूंना वाटतं. ते हिंदूंचं श्रद्धास्थान आहे. मात्र, राम मंदिराची निर्मिती झाली म्हणून कोण हिंदूंचा नेता होत नाही, असं विधान सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलंय. त्यामुळे मोहन भागवतांचा रोख नक्की कुणाकडे आहे, असा सवाल केला जात आहे. भागवतांच्या या वक्तव्यावरून खासदार संजय राऊतांनी प्रतिक्रिया दिली आहे. आरएसएसनंच भाजपला सत्तेत बसवल्याचा



टोला राऊतांनी लगावलाय. तर मोहन भागवतांच्या वक्तव्यावर जितेंद्र आव्हाड यांनीही तिरकस प्रतिक्रिया दिलीय. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी भागवतांच्या वक्तव्याचं समर्थन केलंय. मोहन भागवत काय चुकीचं बोलले असा प्रतिसवाल दानवेंनी केलाय. आरएसएस ही भाजपची मातृसंस्था आहे. त्यामुळे आरएसएसचा शब्द अंतिम असतो. हिंदुत्वाच्या मुद्यावरून आता पुन्हा एकदा मोहन भागवतांनी कान टोचले आहेत. त्यामुळे त्यांचा रोख नेमका कुणाकडे आहे, असा सवाल केला जात आहे. मनुष्य व्हायचं असेल तर शिक्षण आवश्यक आहे.

(शेष पृष्ठ ५ वर)

## मुंबईकरांचा प्रवास अधिक सुरळीत होण्यासाठी 'हा' प्रकल्प ठरणार गेमचेंजर

■ मुंबई : गणेश बागडे

मुंबईकरांचा लोकल प्रवास अधिक सूकर आणि आरामदायी होण्यासाठी रेल्वेकडून विविध उपाययोजना राबवल्या जातात. रेल्वेने एकूण १२ प्रकल्प हाती घेतले आहेत. रेल्वेचा एक प्रकल्प कळवा-ऐरोली उन्नत मार्ग हा प्रगतीपथावर आहे. रेल्वेप्रवास अधिक कार्यक्षम होण्यासाठी अतिरिक्त मार्गिका म्हणून कळवा-ऐरोली उन्नत मार्गाची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाचे काम सध्या वेगाने सुरू असून तीन वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्टय आहे. ठाणे स्थानकातून लाखो लोक प्रवास करतात. त्याचबरोबर ठाणेलगतचे मुंब्रा आणि कळवा स्थानकावरदेखील गर्दीचा भार येतो. गर्दीचा हा भार कमी करण्यासाठी रेल्वेकडून कळवा-ऐरोली उन्नत प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पामुळं ठाणे स्थानकातील गर्दीचा भार कमी होणार आहे. या उन्नत प्रकल्पासाठी ४७६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तसंच, या प्रकल्पासाठी ९५



टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. ठाणे स्थानकातून मुंबईकडे येण्यासाठी आणि हार्बर मार्गावर जाण्यासाठीही गर्दी असते. ऐरोली ते कळवा उन्नत प्रकल्पामुळं वाशी ते बेलापूरहून थेट कल्याणपर्यंत ट्रेन जाईल. ऐरोली ते कळवा मार्ग जोडण्यात आल्यानंतर ठाणे स्थानकातील गर्दी आपसूकच कमी होणार आहे. तसंच, ठाणे स्थानकात जाऊन ऐरोलीला जाण्यासाठी लोकलची वाट पाहण्याची गरज उरणार नाही. त्यामुळं नवी मुंबईहून कळवा किंवा त्यापुढे प्रवास करणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार आहे. ऐरोली ते कळवा उन्नत मार्ग प्रकल्प पूर्ण झाल्यावर कल्याण, कर्जत, कसारा, खोपोली प्रवाशांना थेट ऐरोलीला जाण्यासाठी लोकल उपलब्ध होईल. ठाणे स्थानकातून दररोज साडेसहा लाख प्रवासी ये-जा करतात. त्यामुळं ठाणे स्थानकात गर्दी होते. मात्र, या प्रकल्पामुळं स्थानकातील गर्दी कमी होणार आहे. कळवा-ऐरोली प्रकल्पाला नोव्हेंबर २०१६ मध्ये मंजुरी मिळाली होती.

## पुण्यात फुटपाथवर झोपलेल्या ९ जणांना डंपरने चिरडले; तीन ठार तर सहा जण जखमी

■ पुणे : विशेष प्रतिनिधी


पुण्यातील वाघोली पोलीस स्टेशन समोरील फुटपाथवर झोपलेल्या तिघांना डंपरने चिरडल्याची घटना घडली आहे. या तीन मृतांमध्ये २२ वर्षाचा तरुण, एक वर्षाची मुलगी आणि दोन वर्षाच्या मुलाचा समावेश आहे.तर हे दोघे जण बहिण भाऊ आहेत.या घटनेतील आरोपी गजानन शंकर तोट्रे हा डंपर चालक दारु पिऊन डंपर चालवित असल्याचे तपासात समोर आले असून त्याला अटक करण्यात आली आहे. विशाल विनोद पवार वय २२ वर्ष, वैभवी रितेश पवार वय १ वर्ष आणि वैभव रितेश पवार वय २ वर्ष या तीन जणांची मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाघोली पोलीस स्टेशन



समोरील फुटपाथवर रविवारी रात्री नऊ जण झोपले होते. त्या रस्त्यावरून रात्री एक वाजण्याच्या सुमारास आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे याने त्याच्या ताब्यातील श्प १२ न्ह ०४३७ या क्रमांकाच्या डंपर ने फुटपाथवर झोपलेल्या ९ जणांच्या अंगावर डंपर घातले. तर या घटनेमध्ये विशाल विनोद पवार, वैभवी रितेश पवार आणि वैभव रितेश पवार या तिघांचा जागीच मृत्यू झाला.तर या तीन मृतांमध्ये वैभवी आणि वैभव बहिण भाऊ आहेत.जानकी दिनेश पवार, रिनिशा विनोद पवार ,रोशन शशादू भोसले, नगेश निवृत्ती पवार, दर्शन संजय वैराळ आणि आलिशा विनोद पवार हे सहा जण जखमी झाले आहे. या घटनेतील जखमींना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.आरोपी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे याने मद्यपान केल्याचे तपासात समोर आले असून त्याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाहिजेत

ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे.
पात्रता : १२ वी / मराठी भाषा व कॉम्प्युटर चे ज्ञान असणे आवश्यक.
पत्ता : जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बांद्रा (पूर्व)
संपर्क : ०२२ ३१८०८५०९ / ९८०४३८६७४८ / ९८९२३८६७४८




# शिंदेंना हवे तेच मिळाले

खातेवाटप झाल्यानंतर आता पक्षांतर्गत आणि बाह्य राजकारणाला दुय्यम ठेवून सरकारने आता लोकांच्या प्रश्नांकडे पहायला हवे. महाराष्ट्र राज्यासमोरील आव्हाने वाढली असताना पक्ष किंवा नेत्यांबाबत लोकांमध्ये संशयाचे वातावरण असताना त्याचा परिणाम सरकारच्या धोरणांवर होता कामा नये. मात्र अजूनही पालकमंत्रीपदाचं काही ठरत नसल्यामुळे अस्वस्थता कायम आहे. तरीही अर्धेअधिक राजकारण स्थिर होण्यास उशीरच झाल्याने सरकारच्या पहिल्याच हिवाळी अधिवेशनातून ठोस काही निष्पन्न झालेले नाही. हिंसा, आंदोलने, परप्रांतीय मराठी वाद, अत्याचार आणि हत्येच्या घटनांना वेळीच हाताळताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कारभाराच्या सुरुवातीलाच कसोटी लागणार आहे. स्पष्ट बहुमत मिळाल्याने अंतर्गत राजकारणाचा धोका राज्यातील सत्तेला आहे, खातेवाटपावरून झालेल्या रुसव्याफुगव्याने हे स्पष्ट केले आहे. येत्या काळात क्षीण झालेल्या विरोधकांपेक्षा अंतर्गत आणि मित्रपक्षांच्या राजकारणाला सरकारला तोंड द्यावे लागणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दबावतंत्र यशस्वी झाल्याचे म्हटले जात आहे. खातेवाटप होत असताना एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनीही 'महाबहुमत' मिळवलेल्या भाजपच्या तुलनेत आपले पारडे हलके राहणार नाही, याची व्यवस्थित काळजी घेतली. भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकाची महत्त्वाची खाती शिवसेनेने आपल्याकडे ठेवण्यात यश मिळवले आहे. विशेष करून शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात येऊ घातलेले प्रकल्प तडीस नेण्यासाठी त्यांच्या ताब्यात आलेली खाती शिंदेंसाठी महत्त्वाची ठरली आहेत. 'नगरविकास, गृहनिर्माण,



सार्वजनिक बांधकाम' याशिवाय 'एमएमआरडीए, सिडको' या मोठे निर्मितीमूल्य असलेल्या संस्थांवर एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व राहणार आहे. त्यामुळे ठाणे जिल्हा आणि परिसर अशा त्यांच्या बालेकिल्ल्यात येऊ घातलेल्या आणि काम सुरू असलेल्या प्रकल्पांवरही शिंदे यांचे नियंत्रण राहील. त्यामुळे त्यांचे सरकारमधील 'वजन' कायम राहील. दुसरीकडे राज्यातील पालिका, नगर परिषदा, महानगरपालिकांच्या निधीबाबतही एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाला महत्त्व येणार आहे. राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री आणि सत्तेतील मित्र अजित पवार यांच्याकडे वित्त विभाग सोपवला गेला आहे. राज्याच्या तिजोरीच्या चाव्या अजित पवार यांच्याकडे आहेत, परंतु शहर किंवा पालिका क्षेत्रांच्या विकासाचे अधिकार एकनाथ शिंदे यांच्याकडेच आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधील घटक पक्षांमधील सत्तेचे संतुलन राखण्याचा यशस्वी प्रयत्न करताना कोणालाही झुकते माप मिळणार नाही, याचीही दक्षता घेतली आहे. लवकरच महापालिकांच्या निवडणुका होणार असल्याने एकनाथ शिंदे यांच्या पदरात पडलेली खाती त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्याही फायद्याची आहेत. या माध्यमातून ठाकरेंच्या शिवसेनेची कमी झालेली ताकद वाढवण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांनाही एकनाथ शिंदे यांना नियंत्रणात आणता येणार आहे. एकनाथ शिंदे यांनी गृहविभागाचा आग्रह धरला होता, परंतु हे खाते भाजपच्या राजकीय नियंत्रणासाठी 'महत्त्वाचे' असल्याने भाजप त्यावर पाणी सोडणार नाही, हे स्पष्ट होतेच. दुसरीकडे फडणवीस यांच्या याआधीच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातही गृहखाते त्यांनी स्वत:कडेच ठेवले होते. त्यामुळे या विभागाचे 'महत्त्व' भाजप जाणून आहे. अशा परिस्थितीत तडजोड म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे आलेली नगरविकास, गृहनिर्माण, बांधकाम विभाग अशी 'निर्माणा'ची खातीही मोलाचीच आहेत. दुसरीकडे अजित पवार यांच्याकडे गृहविभागाची धुरा सोपवली असती तर शिंदे यांना फडणवीसांच्या तुलनेत राजकीय अडचण होण्याची शक्यता होती. गृहविभाग फडणवीसांकडेच असल्याने तो प्रश्न आता उरलेला नाही, त्यामुळे शिंदे यांचे दबावतंत्र यशस्वी झाले, असेच म्हणावे लागेल.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त आणि राज्य उत्पादन शुल्क ही खाती महत्त्वाची आहेत. राज्यातील तिजोरीच्या चाव्या नि:संशय पवारांकडे आहेत. यामुळे येत्या काळात शिंदे आणि पवार यांच्यात निधीवाटपाचे राजकारणही पाहायला मिळण्याची शक्यता आहे. नगरविकास विभागामुळे पुणे परिसर तसेच पालिकांतर्गत धोरणांच्या अंमलबजावणीचे अधिकार शिंदे यांच्याकडे असल्याने भाजपने पवारांच्या राजकारणालाही मर्यादित ठेवले आहे. यातून भाजपसहीत शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीलाही महापालिकेच्या निवडणुकीत परस्परांच्या सहकार्यावर अवलंबून राहावे लागणार आहे. 'महसूल' हे तिसऱ्या क्रमांकाचे महत्त्वाचे खाते चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे असल्याने त्यावर पर्यायाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे नियंत्रण राहणार आहे. असे असताना एकनाथ शिंदे यांचे समर्थक आणि शिवसेनेचे नेते प्रताप सरनाईक यांच्याकडे परिवहन खाते आले आहे. या खात्याचे महत्त्व लक्षात घेता एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील बालेकिल्ल्याच्या पदरात आणखी एक महत्त्वाचे खाते मिळवण्यात शिंदे यशस्वी झाले. येत्या महापालिका निवडणुकांना सामोरे जाताना जी महत्त्वाची खाती सोबत असणे गरजेचे होते, ती एकनाथ शिंदे यांनी मिळवली आहेत. या खात्यांच्या माध्यमातून शिंदे हे महापालिका प्रशासनांना आपल्या प्रभावाखाली आणू शकतात तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणावरही आपले नियंत्रण ठेवू शकतात. त्यासाठी जरी शिंदे यांना अजित पवारांच्या वित्त विभागावर अवलंबून राहावे लागणार असले तरी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दरबारी उपमुख्यमंत्री शिंदे यांचा 'शब्द' आजही 'मोलाचा' आहे. मुख्यमंत्री फडणवीस आपला शब्द खाली पडू देणार नाहीत, हे शिंदे जाणून आहेत. मुंबई किंवा ठाणे परिसरातील महापालिकांच्या निवडणुकीत उद्धव ठाकरेंना शह देण्यासाठी भाजपला शिंदेंची गरज आहे, त्यामुळे त्यांचे महत्त्व वादातीत आहे. शिंदे स्वत:चे महत्त्व चांगलेच ओळखून आहेत.

# मेरा वक्त भी बदलेगा?

'मेरे बारे में कोई राय मत बनाना गालिब, एक ऐसा दौर आएगा मेरा वक्त भी बदलेगा, तेरी राय भी बदलेगी' अशी शायरी म्हणत छगन भुजबळांनी थेट अजित पवारांनाच आव्हान दिले आहे. समता परिषदेच्या मेळाव्यात आणि त्यानंतरही भुजबळांनी अजित पवारांसंदर्भात जी वक्तव्ये केली, ती बघता भुजबळ आता राष्ट्रवादीत रमणार नाहीत हे स्पष्ट झाले आहे. खरंतर राजकारणात कोणाच्याही शब्दाला किंवा कृतीला अंतिम मानता येत नाही हे वारंवार सिद्ध झाले आहे.

आज छगन भुजबळ वयाच्या ७७व्या वर्षीही आपल्या स्वभावातील आक्रमकता टिकवून आहेत, मात्र तरीही ते एका विचित्र सापळ्यात अडकले आहेत. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने आणि पक्षांतर्गत राजकीय गोटात होणाऱ्या त्यांच्या उपेक्षेमुळे त्यांनी घेतलेला आक्रमक पवित्रा त्यांच्या राजकीय अस्तित्वावर आणि पक्षातील स्थानावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतो आहे. त्यांच्या या कृतीला 'स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड मारणे' असे म्हणणे वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रातील सत्तास्थापनेत अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी गटाने महायुतीत प्रवेश करताच छगन भुजबळ यांना मंत्रीपदाचा लाभ मिळाला होता, परंतु मंत्रीपदाची संधी मिळूनही त्यांचे समाधान झाले नाही. पक्षांतर्गत समांतर नेत्यांनी त्यांची उपेक्षा केली. मंत्रिमंडळातून कधीही काढले जाण्याची भीती सतत त्यांच्या मनावर होती. यामुळेच त्यांनी मंत्रीपदासाठी किंवा लोकसभेच्या तिकिटासाठी अधिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.



यामध्ये ते स्वत:ला अजित पवार यांच्याशी थेट संघर्षाच्या उंबरठ्यावर घेऊन गेले. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर त्यांचा आक्रमक पवित्रा आणि मनोज जरांगे यांच्यासोबतची थेट वादावादी, यामुळे मराठा समाजातही नाराजी पसरली. मराठा आणि ओबीसी समाजात उघडपणे संघर्ष निर्माण झाल्याने भुजबळ यांचे राजकीय समीकरण अधिकच बिघडले. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांची अजित पवार यांच्यावरील नाराजी आणि त्यातून उगम पावलेला सत्तेचा संघर्ष हा अधिक जटिल आणि गंभीर बनला आहे. छगन भुजबळ आणि अजित पवार यांच्यातील वाद ही एका दिवसाची घटना नाही. भुजबळ यांनी शरद पवार गटाचे निलेश लंके यांना अहमदनगरमधील विजयासाठी केलेली मदत, तसेच सुनेत्रा पवार यांचा बारामती लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव, या दोन घटनांनी अजित पवार यांना भुजबळ यांच्याविषयी नाराजी निर्माण करण्यास भाग पाडले. सुनेत्रा पवारांच्या पराभवानंतर अजित पवार यांच्या घरी तणाव होता, असे सांगत भुजबळांनीच या घडामोडींना दुजोरा दिला आहे.

नाशिक जिल्ह्यातील राजकारणातही भुजबळांचा दुटप्पीपणा कायम दिसत राहिला. शिवसेनेच्या ज्या हेमंत गोडसे यांनी स्वत: छगन भुजबळ आणि पुतणे समीर भुजबळ यांचा लोकसभा निवडणुकांमध्ये दारुण पराभव केला होता, त्या हेमंत गोडसेंना पराभूत करण्यात भुजबळांनी यंदाच्या लोकसभेत महत्त्वाची भूमिका बजावली. गोडसेंना उमेदवारी मिळत नव्हती, त्यावेळी सातत्याने त्यांच्या विरोधात वक्तव्य करून भुजबळांनी वातावरण गढूळ केले. आपलाही या निवडणुकीत विजय होऊ शकत नाही हे लक्षात आल्यावर आपण माघार घेत असल्याचे नाट्य उभे केले. त्यानंतरही भुजबळ गप्प बसले नाहीत. त्यांचा मुलगा पंकज भुजबळ यांना विधान परिषदेत संधी मिळूनदेखील समीर भुजबळ यांनी नांदगाव मतदारसंघात शिवसेनेच्या सुहास कांदे यांना आव्हान दिले. युतीचे महत्त्वाचे नेते म्हणून ज्या भुजबळांची ओळख आहे, त्यांचाच पुतण्या समीर भुजबळ युतीत मिठाचा खडा बनत असेल, तर अजित पवार त्यांना कसे माफ करतील? म्हणूनच भुजबळांच्या बंडानंतर अजित पवारांकडून कोणतीही प्रतिक्रिया येताना दिसत नाही.

छगन भुजबळ यांच्या या आक्रमक धोरणामुळे त्यांचे स्वत:चेच राजकीय अस्तित्व धोक्यात आले आहे. आजच्या घडीला त्यांच्यापुढे तीन प्रमुख पर्याय आहेत. त्यातील पहिला पर्याय म्हणजे राष्ट्रवादीत राहून संघर्ष करणे, परंतु पक्षात त्यांना मिळणाऱ्या स्थानाच्या अभावामुळे हा मार्ग कठीण वाटतो. दुसरा पर्याय म्हणजे भाजपमध्ये प्रवेश करणे. त्यांनी अलीकडे भाजपच्या नेत्यांची भलामण केली असली तरी अजित पवार यांची सहमती नसताना हा निर्णय घेणे कठीण ठरेल. तिसरा पर्याय म्हणजे स्वतंत्र नेतृत्व उभे करणे. ओबीसी समाजाच्या संघटनाला अधिक बळकटी देऊन समता पार्टीसारख्या संघटनेद्वारे नवा राजकीय प्रवास सुरू करणे. या तिन्ही पर्यायांत त्यांना गतवैभव प्राप्त होईल असे दिसत नाही. त्यांच्या अलीकडच्या अतिरेकी आक्रमकतेमुळे त्यांचे नुकसान होण्याचीच शक्यता अधिक आहे. संयमाने आणि चर्चा करून त्यांनी हा वाद सोडवण्याचा प्रयत्न केला असता, तर त्यांची राजकीय प्रतिष्ठा कायम राहिली असती. भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी समाज पुन्हा एकत्र येईल का किंवा ते भाजपमध्ये जाऊन आपल्या राजकीय भविष्याला नवी दिशा देतील का? त्यांच्या अलीकडच्या धोरणांनी त्यांनी राजकीय साखळी गमावल्याचे दिसते.


# बाटलीबंद पाण्यावर आरोग्य विनाशाचा तवंग!

**बाटलीबंद पाण्याद्वारे मानवी शरीरात अतिसूक्ष्म प्लास्टिकचे कण तसेच अन्य काही घातक रसायने जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांचा धोकादायक आणि अतिजोखमीच्या श्रेणीत समावेश करण्याचा निर्णय एफएसएसएआयने घेतला, परंतु बाटलीबंद शीतपेयांसह इतर पेयांबाबतचे काय? त्यावर कोणतेही निर्बंध का नाहीत? प्लास्टिकच्या बाटल्यांच्या वापरातून पाणी पिताना जर अतिसूक्ष्म कण आणि काही घातक रसायने जर मानवी शरीरात प्रवेश करत असतील तर ती शीतपेये किंवा अन्य प्रकारच्या पेयांमधून जाणार नाहीत का, याचाही विचार होणे महत्त्वाचे आहे. आपल्याकडे केवळ पाणीच नाही, तर शीतपेये, दूध, दही, तूप, तेल आदींपासून अनेक पदार्थ हे प्लास्टिकच्या पिशव्या, डब्यांतून अथवा बाटल्यांमधूनच विक्रीसाठी उपलब्ध असतात.**

पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर अर्थात बाटलीबंद पाणी हे आता पिण्यासाठी सुरक्षित आहे की आरोग्यासाठी घातक आहे, हेच आता अनेकांसाठी समजेनासे झाले आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) बाटलीबंद पाण्याचा उच्च जोखमीच्या अन्न श्रेणीमध्ये नुकताच समावेश करण्याचा निर्णय घेतला. बाटलीबंद पाण्यातून अतिसूक्ष्म प्लास्टिकचे कण अनेकांच्या शरीरात प्रवेश करत असल्याचे अनेक संशोधनांतून आढळून आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून पिण्यासाठी सर्वात सुरक्षित पाणी म्हणून मानले जाणारे पाणी हे पिण्यासाठी आरोग्यदायी नसल्याचे समोर येताच अनेकांच्या तोंडचे पाणी पळाले. बाटलीबंद पाणी आरोग्यदायी नसले, तरी यावर पूर्णपणे बंदी आणण्याचा निर्णय काही अद्याप घेण्यात आलेला नाही. आरोग्यासाठी काही घातक रसायने तसेच अतिसूक्ष्म प्लास्टिकचे कण या पाण्यातून मानवी शरीरात जातात.

त्यामुळे कर्करोगासारख्या काही मोठ्या आजारांना निमंत्रण मिळते, असे लक्षात आल्यानंतर एफएसएसएआयने बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर काही कडक निर्बंध जरूर लागू केले आहेत, परंतु या निर्बंधांनंतर तरी बाटलीबंद पाणी हे पूर्णपणे आरोग्यदायी असेल का, हा प्रश्न आजही अनेकांच्या मनात कायम घर करून आहे. कारण, इतक्या वर्षांपासून सर्वात सुरक्षित पाणी म्हणून ज्या बाटलीबंद पाण्याचा वापर जगभरातील नागरिकांकडून सर्रासपणे होत आहे, तेच पाणी आरोग्यासाठी धोकादायक आहे, हे जेव्हा अचानक कळते तेव्हा अनेकांच्या मनात नाना शंका उपस्थित झाल्याशिवाय राहत नाहीत. आतापर्यंत आपण आरोग्यदायी पाणी म्हणून चक्क धोकादायक पाण्याचे सेवन केले. आता पुढे काय? सुरक्षित पाणी म्हणून आपल्याकडे आता दुसरा पर्याय काय, असे नानाविध प्रश्न उभे राहले आहेत. याची उत्तरे सध्याच्या घडीला तरी मिळेनाशी झाली आहेत. बाटलीबंद पाणी धोकादायक असल्याचे समोर आल्यानंतर याजागी सुरक्षित आणि आरोग्यदायी पाणी म्हणून आणखी एखादा पर्याय अद्याप तरी समोर आलेला नाही.

धोकादायक बाटलीबंद पाण्याला लवकरच पर्याय जरूर शोधले जातील, परंतु सध्या तरी बाटलीबंद पाणी अधिकाधिक आरोग्यदायी आणि सुरक्षित कसे होईल, यासाठीच्या उपाययोजना करण्यावरच भर देण्यात आला आहे. एफएसएसएआयने सध्या तरी बाटलीबंद पाणी उत्पादक कंपन्यांवर काही प्रमाणात निर्बंध घालून पाणी आरोग्यदायी आणि सुरक्षित करण्यावरच लक्ष केंद्रित केले आहे. या




निर्बंधांनुसार बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांची आता किमान वर्षातून एकदा तरी एफएसएसएआयकडून तपासणी होणार आहे. बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी केल्यानंतरच उत्पादक कंपन्यांना पाणी विक्रीसाठीचे प्रमाणपत्र मिळणार आहे. एफएसएसएआय विविध निर्बंधांद्वारे बाटलीबंद पाणी आरोग्यदायी आणि सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत आहे, हे स्वागतार्ह आहेच, परंतु बाटलीबंद पाणी उत्पादक कंपन्या या निर्बंधांतून अन्य काही पळवाट शोधणार नाहीत, याकडेही तितकेच डोळसपणे लक्ष ठेवण्याची गरज आहे. कारण, आपल्याकडे बाटलीबंद पाण्याच्या सुरक्षिततेबाबत अजिबात गांभीर्य असल्याचे जाणवत नाही. नामवंत कंपन्यांच्या नावाने बनावट बाटलीबंद पाण्याच्या विक्रीचे प्रकार आपल्याकडे काही नवीन नाहीत. अशा कंपन्यांना बनावट बाटलीबंद पाणी विक्रीची परवानगीच कशी मिळते, हा मुळात प्रश्न आहे. अशा कंपन्यांवर बनावट बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करतानाच त्यांच्यावर का कारवाई होत नाही? त्यांच्यावर कारवाई होत नसल्याने अशा एक दोन नव्हे, तर अनेक कंपन्या या बाजारात बनावट बाटलीबंद पाण्याची विक्री करून नागरिकांची दिशाभूल करत असतात. केवळ बनावट कंपन्यांच्या माध्यमातूनच नागरिकांची दिशाभूल होते असे नाही. अनेकदा तर रेल्वे किंवा बस प्रवासादरम्यान चक्क वापरलेल्या बाटल्यांमध्येच पुन्हा साधे पाणी भरून झाकणाच्या ठिकाणी फक्त चिकटपट्टी लावून सुरक्षित बाटलीबंद पाण्याच्या नावाने ते खपवले जाते. म्हणूनच असे गैरप्रकार रोखण्यासाठीही कठोरात कठोर कारवाईची गरज आहे. अन्यथा बाटलीबंद पाण्याला आरोग्यदायी आणि सुरक्षित बनविण्यासाठी निर्बंध घालून उपाययोजना केल्यातरी बनावट उत्पादकांमुळे नागरिकांची होणारी फसवणूक टळणार नाही. बाटलीबंद पाण्याद्वारे मानवी शरीरात अतिसूक्ष्म प्लास्टिकचे कण तसेच अन्य काही घातक रसायने जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांचा धोकादायक आणि अतिजोखमीच्या श्रेणीत समावेश करण्याचा निर्णय एफएसएसएआयने घेतला, परंतु बाटलीबंद शीतपेयांसह इतर पेयांबाबतचे काय? त्यावर कोणतेही निर्बंध का नाहीत? प्लास्टिकच्या बाटल्यांच्या वापरातून पाणी पिताना जर अतिसूक्ष्म कण आणि काही घातक रसायने जर मानवी शरीरात प्रवेश करत असतील तर ती शीतपेये किंवा अन्य प्रकारच्या पेयांमधून जाणार नाहीत का, याचाही विचार होणे महत्वाचे आहे. आपल्याकडे केवळ पाणीच नाही, तर शीतपेये, दूध, दही, तूप, तेल आदींपासून अनेक पदार्थ हे प्लास्टिकच्या पिशव्या, डब्यांतून अथवा बाटल्यांमधूनच विक्रीसाठी उपलब्ध असतात. या पदार्थांच्या सुरक्षिततेचे काय? प्लास्टिकच्या वापरामुळे हे सर्व पदार्थ खरेच आपल्यासाठी आता खरेच आरोग्यदायी आहेत की नाही, याची उत्तरे कोण देणार? पूर्वी प्लास्टिकचा पर्याय उपलब्ध नसताना दूध काचेच्या बाटल्यांमधून उपलब्ध व्हायचे. शीतपेयेसुद्धा काच अथवा स्टीलच्या बाटल्यांमध्येच विकली जायची, परंतु प्लास्टिकचा पर्याय उपलब्ध झाल्यापासून दूध पिशव्यांमधूनच बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होऊ लागले. काचेच्या शीतपेयांच्या बाटल्या घटत जात असून शीतपेयांसाठीही आता अधिकाधिक प्लास्टिकच्याच बाटल्या सर्रासपणे वापरल्या जात आहेत.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, मुंबई.

ई निविदा सूचना क्रमांक : २८/२०२४-२५

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा.बां.विभागात नोंदणीकृत/अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या ऑन लाईन ई निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, https://mahatender.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २४.१२.२०२४ वेळ दुपारी ०१.०० ते ०८.०१.२०२५ वेळ दुपारी ०१.०० पर्यंत ऑन लाईन डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास ऑन लाईन ई निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई हे दिनांक ०९.०१.२०२५ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास 8-1 व त्यावरील डिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑन लाईन सादर करणे करिता स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण २७ कामे समाविष्ट असून सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

(उपरोक्त काम हे १० लाखांच्या वरील आहे.)

जा.क्र.काअ/दमुंविवि/निविदा/७२५४/२०२४-२५

दि. १७.१२.२०२४

-sd-

कार्यकारी अभियंता,
दक्षिण मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५२०७

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
बहुमजली इमारती बांधकाम विभाग,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला, आर.सी.मार्ग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१.

Email : msbckurla.ee@mahapwd.gov.in ☎ ०२२-२५२२०२७७ ०२२-२५२२४०६०

जा.क्र.काअ/बइबांवि/निविदा/२९६४/२०२४ दिनांक : १२/१२/२०२४

ई-निविदा सुचना क्र. ११ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई-७१, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य तो आवश्यक अनुभव असलेल्या Companies / Agencies / Firms / Vendors / Individuals etc. इत्यादींकडून खालील १ कामाकरीता ई-निविदा मागवीत आहोत. ई-निविदा बाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in पहायला मिळेल. तसेच ई-निविदा दिनांक १९/१२/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १५/०१/२०२५ रोजी १७.३० पर्यंत या कालावधीत उपरोक्त संकेत स्थळावरुन download करता येईल. सदर कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०३/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४००००१ यांचे कार्यालयात घेण्यात येईल. सदर ई-निविदा दिनांक १७/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता शक्य झाल्यास अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर, मुंबई-७१ यांचे कार्यालयात उघडण्यात येईल.

तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, बहुमजली इमारती बांधकाम विभाग, चेंबूर, मुंबई-७१ कार्यालयातील सुचना फलक.

Kalyani
(क.र. गुप्ता)
कार्यकारी अभियंता
बहुमजली इमारती बांधकाम विभाग,
चेंबूर, मुंबई-७१.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५११३

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# किशोरवयीन मुला-मुलींसाठी 'मैत्री क्लिनिक' ठरतेय आधार! साडे सोळा लाख मुला-मुलींना मार्गदर्शन...

**मुंबई : सम्यक कासारे**

मोबाईल... सोशल मिडिया व गुगलबाबामुळे हव्या असलेल्या तसेच नको असलेल्या किंवा पाहू नयेत अशा शेकडो गोष्टी सहजी दिसतात. अगदी गावखेड्यातील लहामुलांच्या हातातही आता मोबाईल असतो. यातूनच तारुण्याच्या उंबरठ्यावर येऊ पाहाणारे तरुण तरुणींना किशोरवयीन अवस्थेत भेडसवणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळणे अत्यंत गरजेचे बनले आहे. आरोग्य विभागाने नेमकी हिच गोष्ट लक्षात घेऊन राज्यात मोठ्या प्रमाणात 'मैत्री क्लिनिक' सुरु केली असून गेल्या वर्षभरात जवळपास साडेसोळा लाख किशोरवयीन मुलामुलींना योग्य समुपदेशन केले आहे. मानवी जीवनातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या किशोरवयीन अवस्थेत भेडसावणाऱ्या विविध शारीरिक आणि मानसिक आरोग्यविषयक समस्यांवर समुपदेशनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सुरु करण्यात आलेले मैत्री क्लिनिक राज्यातील किशोरवयीन मुला-मुलींसाठी आधार ठरतेय. किशोरवयीन आरोग्यासाठी राज्यात ९५८ 'मैत्री क्लिनिक्स'ची स्थापना करण्यात आली आहे. हे 'मैत्री क्लिनिक' राज्यातील निवडक जिल्हा सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये स्त्री रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये, शहरी भागात व काही प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये स्थापन करण्यात आलेली आहेत.

मावळणारे बालपण व खुणावणारे तारुण्य यांचा उंबरठा असलेल्या किशोरवयीन टप्प्यावर जीवनाला वेगळे वळण मिळते. शारीरिक, मानसिक, भावनिक,



प्रजनन, लैंगिक, वैचारिक तसेच वर्तणुकीतील बदलाची १० ते १९ वर्षे वयोगटातील अवस्था मुला-मुलींच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची असते. या वयात पडणारे प्रश्न, भेडसावणाऱ्या समस्या यावर शास्त्रीय दृष्टिकोनातून मिळणारी उत्तरे त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम घडवू शकतात. याच उद्देशाने केंद्र सरकारच्या प्रजनन व बाल आरोग्य भाग – दोन अंतर्गत 'मैत्री क्लिनिक' सुरू करण्यात आले आहेत.

किशोरवयीन मुला-मुलींमध्ये शारीरिक, मानसिक, तसेच भावनिक बदल घडतात. या बदलांना सामोरे जाताना ते काहीसे बावरून जातात. प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची उत्सुकता त्यांच्यात असते. ही उत्सुकता चांगल्या मार्गाने व शास्त्रीय पद्धतीने शमवण्याचा प्रयत्न 'मैत्री क्लिनिक'मध्ये केला जातो. या क्लिनिकमध्ये तज्ज्ञ डॉक्टर व समुपदेशक नियुक्त करण्यात आले आहेत. किशोरवयीन वयातील शारीरिक, मानसिक, भावनिक, लैंगिक आरोग्य, आहार, विवाहपूर्व मार्गदर्शन, कुटुंब नियोजन साधने याबाबत माहिती व समुपदेशन करण्यात येते. तसेच वैद्यकीय तपासणी व उपचाराची सुविधाही पुरवण्यात येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे क्लिनिकमध्ये येणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींची सर्व माहिती गोपनीय ठेवण्यात येते. राज्यातील एकूण ९५८ किशोरवयीन 'मैत्री क्लिनिक'मध्ये प्रत्येकी दोन वैद्यकीय अधिकारी व दोन स्टाफ नर्स प्रशिक्षित असून, किशोरवयीन आरोग्य 'मैत्री क्लिनिक'मध्ये येणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींना त्यांच्या आरोग्य विषयक समस्यांवर मार्गदर्शन केले जाते.

## भारतीय प्रशासन सेवेत दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

राज्य सरकारच्या सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांना नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.




अमरावती विभागाचे उपायुक्त संजय पवार यांची चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदू बेडसे यांची छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक विकास अयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे खासगी सचिव रवींद्र खेबुडकर यांची नियुक्ती मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागाचे उपसचिवपदी करण्यात आली आहे. नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले निलेश सागर हे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी, तर लक्ष्मण भिका राऊत हे बालहक्क सुरक्षा आयोगाचे सचिव झाले आहेत. कल्याण-डोंबिवलीच्या स्मार्ट शहराच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी माधुरी सरदेशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. ज्योत्स्ना पडियार यांची अर्थ व सांख्यिकी आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मूर्तिकारांना पुढील वर्षीही शाडूची माती मोफत देणार

**मुंबई : विशाल कारंडे**

पुढील वर्षीचा गणेशोत्सवही पर्यावरणपूरक व्हावा याकरीता मुंबई महापालिकेने मुर्तिकारांना शाडूची माती व जागा मोफत उपलब्ध करून देण्याचे ठरवले आहे. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी मुंबई महापालिकेने आयोजित केलेल्या बैठकीत पालिका प्रशासनाने ही माहिती दिली. मात्र पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी केवळ माती देऊन जबाबदारी झटकता येणार नाही तर या विषयाचे राजकारण थांबवले पाहिजे असे मत मूर्तीकारांच्या संघटनेने व्यक्त केले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींवर २०२० मध्ये बंदी घातली होती. मात्र विविध कारणांमुळे या निर्णयाची अंमलबजावणी लांबणीवर पडली. बंदी घालून चार वर्षे झाली तरी सार्वजनिक मंडळे आणि मूर्तिकार यांना पीओपीच्या वापरापासून प्रवृत्त करण्यासाठी राज्य सरकारसह अन्य यंत्रणा अपयशी ठरल्यावरून उच्च न्यायालयाने महापालिका, राज्य सरकार यांच्या भूमिकेवर वारंवार ताशेरे ओढले होते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या तोंडावर दरवर्षी पीओपी बंदीचा विषय पुन्हा चर्चेत येत असतो. पुढील वर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा म्हणून पालिकेने आतापासून नियोजन सुरू केले असून याबाबतची एक प्राथमिक बैठक गेल्या आठवड्यात पार पडली. या बैठकीला गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, गणेशोत्सव समन्वय समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पीओपीला सक्षम पर्याय



देण्याकरीता सीपीसीबीसह एक बैठक घेण्याचा ठराव करण्यात आला. तसेच या बैठकीत पुढील वर्षाकरीता मुंबई महापालिकेतर्फे मूर्तीकारांना पर्यावरणपूरक मूर्ती घडवण्यासाठी मोफत जागा व शाडूची माती देण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त प्रशांत सपकाळे यांनी दिली.

सन २०२४ च्या गणेशोत्सवासाठी मुंबई महापालिकेने तब्बल पाचशे टन शाडूची माती मोफत दिली होती. मात्र ही माती देण्याचा केवळ दिखावा पालिका प्रशासनाने करू नये असे मत मूर्तीकारांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले आहे. गेल्यावर्षी एप्रिल महिन्यात माती देण्याची घोषणा केली होती. मात्र त्यानंतर माती मिळून, मुर्ती घडवणे पावसाळ्यात त्या सुकवणे शक्य होत नाही. त्यामुळे यंदा माती जानेवारी महिन्यात द्यावी व चांगल्या दर्जाची द्यावी अशी मागणी मुर्तिकारांच्या संघटनेने केली आहे.

## भाजपमध्ये प्रस्थापितांना धक्का; अन्य पक्षांमधून आलेल्यांना महत्त्वाची खाती, वरिष्ठ नेत्यांना सूचक इशारा

**मुंबई : नितीन देवळेकर**

महायुती सरकारमध्ये भाजपने अन्य पक्षांममधून आलेल्यांना महत्त्वाची खाती देऊन त्यांचे महत्त्व वाढविले आहे. त्याच वेळी प्रस्थापित नेत्यांना आता दूर व्हा, असाच सूचक इशारा दिला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये भाजपने जुन्याजाणत्या नेत्यांचे महत्त्व कमी केले आहे. त्याच वेळी नवीन चेहऱ्यांना अधिक संधी दिली आहे. ते करताना



अन्य पक्षांमधून आलेल्यांकडे महत्त्वाची खाती सोपविण्यात आली आहेत. ग्रामीण भागात पक्षाची पकड बसविण्यासाठी ग्रामविकास आणि पंचायत राज हे खाते अधिक महत्त्वाचे असते. ग्रामीण भागात २५:१५ या योजनेअंतर्गत निधी वाटपाचे अधिकार हे ग्रामविकास मंत्र्यांकडे असतात. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांवर या खात्याचे वर्चस्व असते. भाजपने हे खाते काँग्रेसमधून भाजपमध्ये दाखल झालेल्या जयकुमार गोरे यांच्याकडे सोपविले आहे. वास्तविक गोरे हे करोना काळातील गैरव्यवहारांवरून अडचणीत आले होते. उच्च न्यायालयाने त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधातील तक्रारीची चौकशी करण्याचा आदेश दिला होता. करोना काळात मृत झालेल्यांच्या नावे निधी हडप केल्याचा आरोप गोरे यांच्यावर विधानसभेत झाला होता. या गोरे यांच्याकडे भाजपने ग्रामविकास हे महत्त्वाचे खाते सोपविले. सार्वजनिक बांधकाम हे अन्य महत्त्वाचे खाते भाजपने राष्ट्रवादीतून दाखल झालेल्या शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे सोपविले. साताऱ्याच्या राजकारणात उदयनराजे आणि शिवेंद्रराजे या दोन चुलत्यांमध्ये पूर्वी विकोपाचा वाद होता. पण भाजपच्या श्रेष्ठींनी लक्ष घालत दोघांना एकत्र आणले. सातारा हा शरद पवार यांचा बालेकिल्ला होता. पण अलीकडे शरद पवारांच्या वर्चस्वाला मोठा धक्का बसला. यातूनच भाजपने शिवेंद्रराजे यांना मंत्रिपदाची संधी देत पश्चिम महाराष्ट्र व विशेषत: मराठा समाजात संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रवादीतून आलेल्या संजय सावकारे यांच्याकडे वस्त्रोद्योग खाते सोपिवण्यात आले.

## अंधेरीत नव्याने केलेल्या रस्त्यावर पुन्हा खोदकाम, पहिल्या टप्प्यातील रस्ते कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी रस्त्यांची कामे पुन्हा करण्याची वेळ

**मुंबई : यश सावंत**

अंधेरी पश्चिमेकडील लोखंडवाला परिसरात नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावर पुन्हा एकदा कंत्राटदाराने खोदकाम सुरु केले आहे. काही महिन्यातच या रस्त्याच्या काही भागावर तडे पडले असून हा रस्ता नव्याने तयार करावा लागणार आहे. कोट्यवधी रुपयांची रस्ते कामांची कंत्राटे मिळवणाऱ्या कंत्राटदारांनी व गुणवत्ता देखरेख संस्थांनी कामात कुचराई केल्यामुळे परिसरातील नागरिकांना पुन्हा एकदा गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे.

मुंबई महापालिकेने हजारो कोटींची रस्ते कामे दोन टप्प्यात हाती घेतली आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील कामे सुरू असून या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळल्या आहेत. रस्त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी गुणवत्ता संस्थांची नेमणूक केलेली असतानाही अनेक ठिकाणी रस्त्यांवर तडे गेले आहेत तर काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग उखडला आहे. सांताक्रूझ येथील भार्गव मार्गावरही रस्त्यावर तडे गेले आहेत. त्यातच आता अंधेरी



लोखंडवाला परिसरातील अच्युतराव पटवर्धन मार्गावरही त्रुटी आढळल्या आहेत. त्यामुळे अंधेरीतील या मार्गावरील रस्त्याचा काही भाग उखडून तो पुन्हा नव्याने करण्याची वेळ आली आहे. दरम्यान, नव्याने तयार केलेल्या रस्त्यांची जुन्या रस्त्यापेक्षा दुर्दशा झाल्यामुळे गेल्याच आठवड्यात लोकप्रतिनिधींनी टीका केली होती. भाजपचे आमदार आशिष शेलार आणि शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी चौकशीचीही मागणी केली होती. त्यामुळे रस्त्यांच्या कामांवर मोठ्या प्रमाणावर टीका होऊ लागली होती. दरम्यान, अंधेरी येथील रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी उखडल्याचे आढळून आल्यामुळे रस्त्याचा तेवढा भाग कंत्राटदाराकडून नव्याने बांधून घेतला जात आहे. रस्त्यांच्या कामात मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्यामुळे पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी काही दिवसांपूर्वी उपायुक्तांना रस्त्यांच्या कामांची पाहणी करण्याचे आदेश दिले होते.

## राणीच्या बागेतील हत्तींचा अधिवास पोरका

**मुंबई : सम्यक कासारे**

भायखळ्याच्या जिजामाता उद्यान अर्थात राणीच्या बागेतील शेवटच्या हत्तीणीचा अलिकडेच मृत्यू झाला. अनारकली असे या ५९ वर्षीय हत्तीणीचे नाव होते. देशातील कोणत्याही प्राणीसंग्रहालयात हत्ती ठेवण्यास मनाई करणारा निर्णय केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने २०१६मध्ये घेतला आहे. त्यामुळे आता राणीच्या बागेतील हत्तींचा अधिवास पोरका झाला आहे.

जिजामाता उद्यानातील अनारकली हत्तीण गेल्या महिन्यात एक दिवस संध्याकाळी अचानक जमिनीवर बसली, त्यानंतर तिला उठताच आले नाही. अनारकली ही राणीच्या बागेतील सर्वात वयोवृद्ध प्राणी



होती. १९७७मध्ये अनारकली व लक्ष्मी या दोन्ही हत्तीणी येथे आल्या होत्या. काही वर्षापूर्वी त्यांच्या जोडीला एक नर हत्ती आणला होता. मात्र नंतर त्याला केरळला परत पाठवण्यात आले होते. या दोघींपैकी लक्ष्मीचा चार वर्षापूर्वी संधिवाताने मृत्यू झाला. तेव्हापासून अनारकली एकटीच राहत होती. अनारकलीला दफन करण्यापूर्वी तिच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले होते. त्यामध्ये तिच्या शरीरात तब्बल दीडशे किलोचा ट्युमर असल्याचे आढळून आले होते. मात्र ती जिवंत असताना त्याची कोणतीही लक्षणे दिसली नव्हती.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सायली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ३-४०० ०१८.
दुरध्वनी क्र.०२२-२४९२४३४९, ई-मेल : elcentralmumbai.ee@mahapwd.gov.in
ई निविदा सुचना क्र.३७ सन २०२४-२५ (1st Call)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील कामाकरिता बी १ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | D21252 / 2024-25 Providing Supplying, installing, testing & commissioning professional CCTV Surveillence arrangement on Hire basis for the function for Republic Day Celebration on 26 Jan 2025 at Chhatrapati Shivaji Maharaj park, Dadar, Mumbai. | 897000.00 |
| 2 | D21251/2024-25 Providing supplying installing testing & commissioning of professional sound system for rehersal & actual function day of Repulic Day celebration on 26th January 2025 at Chhatrapati Shivaji Maharaj Park, Dadar Mumbai. | 1890651.00 |

१ वरील अंदाजीत रक्कमेत जी.एस.टी. समाविष्ठ नसून ठेकेदारांनी निविदेत दर भरताना जी.एस.टी. वगळून दर नमुद करावा. अंदाजीत रकमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी.एस.टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात यईल.

२ ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.२३.१२.२०२४ ते दि.०६.०१.२०२५ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.

३ ई निविदा उघडणे : दि.०८.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर

जा.क्र.काअ/ममुंविवि/निविदा/३९८८/२०२४
दिनांक : १८-१२-२०२४

Sd/-
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग
सा.बां.विभाग वरळी

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५२०९

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना क्र.३८ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१ दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामे **सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत.** कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून **दिनांक १९/१२/२०२४ ते दिनांक ०२/०१/२०२५** दुपारी **१५.०० पर्यंत** देण्यता यईल. **भरुन पाठविलेल्या निविदा ०६/०१/२०२५ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्यची किंमत अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Annual Maintenance and minor repair works of Metron Building at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ८२७२९५/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Annual Maintenance and minor repair works of Fremji Denshaw Petit Building (Blood Bank) and Panchsheel Building No.5 at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ७५०५२७/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ३ | Repairing and renovation toilet Block and Bath Portion to Dr. Quarters and residence to High rise Building to Back side Left side Portion above 11th floor to 15th floor to High rise Building at G.T. Hospital Mumbai. | ८२९९६८/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ४ | Repairing to plastering and Painting and window work to ward Passage Portion 2nd floor Both side and Connected bridge Portion to Surgical Building at G.T. Hospital Mumbai. | ८३१२४९/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repairing to internal Plastering and painting and damage false ceiling work OPD 16 to 21 at 1st floor OPD Building at G.T. Hospital, Mumbai. | ८२९२८३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Repairing to internally open to sky Portion (Staircase and lift side) outer side Portion Polymer, Plastering, Painting to Chajja Portion 6th floor to 3rd floor to OPD Building at G.T. Hospital Mumbai. | ८२४८१०/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairing to internally open to sky part Right side Portion (Class room, Office side) Portion Polymer, Plastering, Painting to Chajja Portion 6th floor to 3rd floor to OPD Building at G.T. Hospital Mumbai. | ८२५७२०/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Reairing to internally Plastering, and painting work to Casualty, Medicine, Sister Room at Gr. floor to OPD Building at G.T. Hospital, Mumbai. | ८१८३३५/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Repairing to Damage Staircase RCC Wall and Repairing to MS railing to OPD Building G.T. Hospital, Mumbai. | ८२८१७४/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Repairing and renovation toilet Block and Bath Portion to Dr. Quarters and Residence to High rise Building to Back side Left side Portion above 7th floor to 10th floor to High rise Building at G.T. Hospital, Mumbai. | ८२९४६२/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Repairing and renovation toilet Block and Bath Portion to Dr. Quarters and Residence to High rise Building to Back side Right side Portion above 11th floor to 15th floor To High Rise Building at G.T. Hospital Mumbai. | ८२१९५९/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १२ | Repairing and renovation toilet Block and Bath Portion to Dr. Quarters and Residence to High rise Building to Back side Right side Portion above 7th floor to 10th floor To High Rise Building at G.T. Hospital Mumbai. | ८२२७६८/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १३ | Repairs to Patch Work to Walk Portion Below Shade Portion at G.T. Hospital Mumbai. | ७१८५३३/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १४ | Repairing and renovation Dy. Supdt. Cabin and A.O Cabin at Ground floor to Main Building G.T. Hospital, Mumbai. | ८२४४९६/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सुचना फलकावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

जा.क्र.एघ(सा.बां.)वि/निविदा/ ६०७३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, मुंबई.
दिनांक : १३/१२/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५१२७

# वसईतील जलमार्ग सुरक्षेसाठी सतर्कता, प्रवासी बोटींचे परीक्षण; ठेकेदारांना सूचना

**■ वसई : प्रतिनिधी**

मुंबईमधून एलिफंटाकडे जाणाऱ्या प्रवासी बोटीचा अपघात होऊन १४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वसई विरार मधील वसई भाईदर रोरो, पाणजू व अर्नाळा या प्रवासी वाहतूक जलमार्ग प्रवासी बोटींचे महाराष्ट्र सागरी मंडळाकडून परिक्षण केले जाणार आहे. व त्यानुसार संबंधित ठेकेदारांना सूचना केल्या जाणार आहेत.

वसई तालुक्यात तीन ठिकाणी जलमार्ग प्रवासी वाहतूक केली जाते. यात वसई ते भाईदर अशी रोरो सेवा फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आली आहे. त्यातूनही दररोज मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. तर दुसरीकडे पाणजू बेटावर व अर्नाळा किल्ला बेटांवर राहत असलेल्या नागरिकांना ही प्रवासी बोटीने प्रवास करावा लागतो. मात्र नुकताच मुंबईमधून एलिफंटाकडे जाणाऱ्या निलकमल या प्रवासी बोटीला नेव्हीच्या स्पीड बोटची धडक बसून अपघात



घडला यात १४ जणांचा मृत्यू झाला तर नव्वद पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले. या दुर्घटनेनंतर जलमार्गाने बोटींतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक, लाईफ जॅकेट, बोटींची देखभाल दुरुस्ती, रिंग बोयाज नसणे अशा विविध प्रश्न समोर आले आहेत. काही ठिकाणी लाईफ जॅकेट असते मात्र प्रवासी वापरत नाही. तर काही ठिकाणी धोकादायक पद्धतीने बसवून प्रवासी वाहतूक होत असते. अशा दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी असा महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून पुन्हा एकदा वसईत प्रवासी सेवा देणाऱ्या बोटींचे परीक्षण केले जाणार आहे. त्यात बोट सुस्थितीत आहे किंवा नाही, लाईफ जॅकेट सुविधा, जास्त प्रवासी वाहतूक करू नये, जलमार्ग वाहतूक प्रवासी करताना भौगोलिक स्थितीचा अंदाज, प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ज्या आवश्यक उपाययोजना अशा सर्व बाबी तपासून घेतल्या जाणार आहेत. तशा सूचना ही केल्या जाणार आहेत असे महाराष्ट्र सागरी मंडळाचे अधिकारी अविनाश पाटील यांनी सांगितले आहे.

# नाताळ, नववर्षच्या मेजवान्यांची तयारी सुरू, खासगी शेफच्या मागणीत वाढ

**■ वसई : सुचिता देशमुख**

डिसेंबर महिन्यातील हिवाळ्यातील नाताळचा सण, नववर्षाचे स्वागत आणि सलग असलेल्या सुट्ट्यांमळे मेजवान्या, स्नेहमिलन, सोहळे आदींच्या आयोजनाची सर्वत्र जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. यासाठी इव्हेंट मॅनेजर, ऑर्गनायजर एजन्सी, केटरर्स आदींची नियुक्ती करण्यात येत आहे. मात्र त्यातही खासगी



बल्लावाचार्याची अर्थात प्रायव्हेट शेफची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खासगी मेजवान्यांमध्ये खासगी बल्लवाचार्य शेफआणण्याचा कल गेल्या काही वर्षात वाढू लागला आहे. २०१८ साली प्रदर्शित झालेल्या 'गुलाबजाम' चित्रपटात खासगी खानसामा म्हणजेच 'प्रायव्हेट होम शेफ' किंवा 'प्रोफेशनल शेफ' ही संकल्पना दाखवण्यात आली होती. प्रायव्हेट शेफ ही संकल्पना परदेशात पूर्वीपासून कार्यरत आहेत. भारतातही ती गेल्या काही वर्षापासून रूजू झाली होती. गुलाबी थंडीतील नाताळ सण, नववर्षाचे स्वागत आणि महिना अखेरीस लागून आलेल्या सलग सुट्ट्या या समीकरणात मेजवान्या पार्टीज, गेट टुगेदर, गॅदरींग, स्नेहमिलन आदी रंगत आणत असतात. त्यामुळे फार्महाऊस, व्हिला, कार्यालय किंवा घरी पार्टीसाठी किंवा स्नेहमिलनासाठी अशा प्रायव्हेट शेफची मागणी वाढली आहे. गेल्या काही वर्षात याचे व्यावसायिक रूप वाढते आहे. करोना काळात आणि नंतर सुरक्षेच्या दृष्टीने खासगी प्रायव्हेट शेफची गरज आणि मागणी या दोन्हीमध्ये भर पडली. सध्या प्रायव्हेट शेफ पुरवणाऱ्या एजन्सी, कंपन्याही बाजारात कार्यरत आहेत. प्रायव्हेट शेफ हे प्रोफेशनल किंवा काही वेळेस होम शेफ असतात. मोठ्या पार्टीजसाठी शेफसोबत बटलरची टीम असते. यात जेवणाचा मेन्यू ठरवणे, त्यासाठी लागणारे सामग्री, शिजवण्यासाठी लागणारी साधने, जेवण वाढण्यासाठी सव्हि करण्यासाठी लागणारी कटलेरी आदी सुविधा शेफ किंवा होस्ट करून देतात. प्रोफेशनल शेफ हे विविध क्युझिनमध्ये पारंगत असल्यामुळे जपानी, कोरिअन, इटालियन, चायनीज, इंडियन, महाराष्ट्रीय आदी सर्वच प्रकारचे व्यंजन बनवतात.

# ठाणे जिल्ह्यातील टोईंग व्हॅन बंद, शहरांमध्ये रस्तोरस्ती उभ्या केलेल्या वाहनांचा अडथळा

**■ कल्याण : आकाश कांबळे**

वार्षिक नुतनीकरणाच्या प्रक्रिया पूर्ण करावयाच्या असल्याने ठाणे जिल्ह्यातील विविध भागातील सुमारे ३० ते ३५ टोईंग व्हॅन मागील काही दिवसांपासून बंद आहेत. शहरात नियमबाह्यपणे उभ्या करण्यात आलेल्या वाहनांचा बंदोबस्त करण्यासाठी स्थानिक वाहतूक विभागाकडून टोईंग व्हॅन फिरविण्यात येतात. ही वाहने बंद असल्याने कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबारनाथ, बदलापूर, भिवंडी शहरात रस्तोरस्ती नियमबाह्यपणे वाहने उभी केली जात असल्याचे चित्र आहे.

वाहतूक विभागाची टोईंग व्हॅन बंद असल्याची माहिती मिळाल्याने वाहन चालक बाजारपेठेत आपली दुचाकी, चारचाकी वाहने वाहतुकीला अडथळा होईल अशा पध्दतीने उभी करत आहेत. त्यामुळे शहरांमध्ये वाहन कोंडीचा प्रश्न वाढला आहे. शहरात टोईंग व्हॅनच्या दिवसभर घिरट्या सुरू असल्याने आपल्या वाहनावर कारवाई नको म्हणून वाहन



चालक सुरक्षित ठिकाणी आपले वाहन उभे करत होते. व्हॅन बंद असल्याने शहरांमध्ये नियमबाह्यपणे वाहने उभी केली जात आहेत. रेल्वे स्थानक परिसर, बाजारपेठांमध्ये आडवी तिडवी वाहने उभी केली जात असल्याने व्यापारी, रेल्वे स्थानकात जाणारे प्रवासी त्रस्त आहेत.


टोईंग व्हॅन चालविणाऱ्या वाहनांचे मालक ही वाहने लवकर सुरू व्हावीत यासाठी वाट पाहत आहेत. एक वाहनावर सुमारे चार ते पाच कामगार तैनात असतात. या कामगारांचे मानधन मालकाला वाहने बंद असली तरी द्यावे लागते. असा प्रशिक्षित कामगार पुन्हा मिळत नाही. त्यामुळे वाहन बंद काळातील मानधन आम्ही त्यांना देतो, असे एका टोईंग व्हॅन मालकाने सांगितले. दर वर्षी टोईंग व्हॅन चालविणाऱ्या वाहन मालकांच्या कागदपत्रांचे नुतनीकरण, त्यांचे शासना बरोबरचे करार वाढून घेण्याची कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण केली जाते. ठाणे जिल्ह्यात विविध शहरांमध्ये सुमारे ३५ हून अधिक टोईंग व्हॅन धावतात.

# पदभार स्विकारताच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक एक्शन मोडवर, खोपट आगारातील असुविधेबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

परिवहन मंत्रीपदाचा पदभार स्विकारल्यानंतर प्रताप सरनाईक ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळाले. रविवारी दुपारी त्यांनी ठाण्यातील खोपट आगाराला भेट देऊन तेथील असुविधांबाबत अधिकाऱ्यांची कानउघाडणी करत त्यांना धारेवर धरलो. तासोचा महिन्याभरात येथे प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या. यापुढे चुकीला क्षमा नाही असेही ते म्हणाले. तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फेब्रुवारी महिन्यात आगारातील असुविधांविषयी अधिकाऱ्यांना बजावले होते. त्यानंतरही सुविधा उपलब्ध झाल्या नसल्याने एसटीच्या कारभाराविषयी सरनाईक यांनी नाराजी व्यक्त केली.

खोपट एसटी आगारात फेब्रुवारी महिन्यात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात



आले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगाराची पाहाणी केली होती. त्यावेळी आगारात मोठ्याप्रमाणात असुविधा आढळून आल्या होत्या. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना खडसावत येथील असुविधांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले होते. प्रताप सरनाईक यांनी परिवहन मंत्री पदाचा पदभार स्विकारला आहे. आगारात सुविधा उपलब्ध झाल्या की नाही याची पाहणी करण्यासाठी सरनाईक अचानक एसटी आगारात शिरले. त्यांनी पाहाणी केली असता, असुविधा कायम असल्याचे दिसून आले. स्वाच्छतागृह, स्नानगृहांची अवस्था अत्यंत वाईट आहे. प्रवाशांनाही वेळेत बसगाड्या उपलब्ध होत नाही.

पहिला दिवस असल्याने कारवाईचा हेतू नाही. पण शिस्त असावी. ठाणे आमचे घर आहे. त्यामुळे घरापासून सुरूवात करावी यासाठी या आगाराची पाहाणी केली.

# मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम

**■ उरण : सचिन कदम**

समुद्राच्या वाढत्या ओहटीमुळे पंधरा दिवसांतील चार दिवस मोरा ते मुंबई जलवाहतुक पाच तास बंद केली जात आहे. त्यामुळे या मार्गाने उरणवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आणि विशेषतः नोकरवर्गाला याचा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येविरोधात नियमित प्रवाशांनी सह्यांची मोहीम सुरू केली आहे.

मोरा बंदरातील गाळ हा आधुनिक पद्धतीने काढण्यात यावा. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि जलवाहतूक विभागाने लक्ष घालून ही समस्या सोडवावी अशी मागणी करण्यात आली आहे. ओहोटीच्या वेळी मोरा बंदरात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने या मार्गावरील बोटी रुतण्याची शक्यता आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून ही सेवा बंद करण्यात येत आहे. मोरा बंदरात गाळ सचण्याची समस्या कायमस्वरूपी आहे. हा गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही ही समस्या सुटलेली नाही. या समस्येला वाचा फोडण्यासाठी प्रवासी दत्ता पुरो यांनी ही स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे.



स्वातंत्र्यपूर्व काळापासून उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यान मोरा मुंबई जलसेवा सुरू आहे. या जलसेवेमुळे उरणवरून विना अडथळा मुंबईत अवघ्या अर्ध्या ते एक तासात या मार्गाने पोहचता येते. त्यामुळे उरण मधील चाकरमानी, व्यवसायिक आणि सर्वसामान्य प्रवासी ही याच मार्गाचा वापर करीत आहेत. मोरा मुंबई जलसेवा ही उरण आणि मुंबई दरम्याची महत्वाची सेवा आहे. मात्र ही सेवा सुरळीत सुरू ठेवण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची आहे. बोर्डाच्या अभियांत्रिकी विभागाची ही जबाबदारी आहे. मात्र या विभागाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ही सेवा खंडित होत आहे.

# वसई विरार महापालिकेच्या 'पेल्हार प्रभाग समिती'च्या कार्यालयाला आग

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार महापालिकेच्या पेल्हार प्रभाग समिती कार्यालयाच्या इमारतीमध्ये आग लागल्याची घटना घडली आहे. गुरुवारी पहाटे तीनच्या सुमारास ही घटना घडली असून या आगीत पाणी पुरवठा व आरोग्य विभागाचे महत्त्वाचे दस्तऐवज जळून खाक झाले आहेत. नालासोपारा पूर्वेच्या भागात वसई विरार महापालिकेचे पेल्हार प्रभाग समितीचे कार्यालय आहे. गुरुवारी पहाटे अचानकपणे प्रभाग समिती कार्यालयातीच्या इमारतीला आग लागली. या घटनेची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविले आहे. या लागलेल्या आगीमुळे पाणी पुरवठा,



बांधकाम, आरोग्य विभागाची विविध प्रकारचे दस्तऐवज व संचिका यात जळून खाक झाल्या आहेत. शॉट सर्किट झाल्याने ही आग लागली असावी असा अंदाज पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या आगीत जी कागदपत्रे व संचिका जळाल्या आहेत त्याचा पंचनामा व चौकशी केली जाईल असे महापालिका उपायुक्त सुभाष जाधव यांनी सांगितले आहे. संगणकीय प्रणालीमध्ये जी माहिती आहे ती पूर्ववत करण्याचे प्रयत्न केले जातील असेही त्यांनी सांगितले आहे. मात्र दस्तऐवज नष्ट करण्यासाठी लावली असावी असा संशय ही नागरिकांमधून व्यक्त होत असून याची चौकशी व्हावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# पालिकेचे पाणी पथक स्थापन, आमदारांनी खडसावताच पालिका सक्रिय

**■ वसई : प्रतिनिधी**

नळ जोडणीतील गैरप्रकार, पाणी वितरणातील अनियमितता आणि त्रुटी आदी समस्या सोडविण्यासाठी वसई विरार महापालिकेने पाणी पथक स्थापन केले आहे. यामध्ये पालिका अभियंता आणि कर्मचारी दर आठवड्यात प्रत्येक प्रभागात जाऊन पाहणी करणार आहेत. आमदार स्नेहा पंडित-दुबे यांनी काही दिवसांपूर्वी आढावा बैठकीत याबाबत खडसावले होते, तसेच अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे वसई विरार पालिकेने हे पथक तयार केले आहे. वसई विरार



महापालिकेतर्फे शहरातील नागरिकांना सुर्या पाणी प्रकल्प, उसगाव आणि पेल्हार धरणातून दररोज पाणी पुरवठा केला जातो. शहराची व्याप्ती वाढत असून लोकसंख्या वेगाने वाढत आहेत. त्यामुळे पाण्याची मागणी सतत वाढत असते. त्यामुळे टॅंकर लॉबी देखील शहरात सक्रीय आहे. पाण्याची मागणी वाढत असल्याने नळजोडणीत, पाणी वाटपात गैरप्रकार आणि अनियमितता होत असल्याच्या तक्रारी सतत होत असतात. अनेक भागांना अद्याप पाणी मिळालेले नाही. ज्यांना पाणी मिळते ते कमी दाबाने मिळत असल्याने पाणी टंचाईची समस्या कायम भेडसावत असते. यासाठी सर्वांना समान आणि पुरेसे पाणी मिळावे अशी मागणी करण्यात येत होती. या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन वसईच्या आमदार स्नेहा पंडित-दुबे यांनी आढावा बैठक घेतली होती. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना खडसावले होते आणि पाणी समिती तयार करण्याची सुचना केली होती.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,

राज्य कामगार विमा योजना रूग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०

ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.inदुरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७

ई-निविदा सुचना क्र. ५७ /२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के बारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
| --- | --- |
| 1. अंदाजपत्रक क्र. अंदाजपत्रक क्र .ओडब्लू/एनएमईडी/एमएसएसडी/एनएमएस/२४००८/२०२४-२५ नवीन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील स्थापित गरम पाण्याच्या जनरेटरसाठी ( 3 नग) अर्धव्यापक वार्षिक देखभाल करणे बाबत (चौथी मागणी) | रूपये १५२४८७६/– |
| 2. अंदाजपत्रक क्र .एसआर/एनएमईडी/बीईएसडी/बीकेसी / २४१३६ / २०२४-२५. शासकीय तंत्रनिकेतन बांद्रा (पूर्व) मुंबई -५१ येथील मे. जॉन्सन बनावटीचे १० प्रवाशी क्षमतेचे २ नग ( तळ मजला + ४ मजले) उदवाहने बदली करणे बाबत. | रूपये ३७९६१०७/– |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.२४.१२.२०२४ ते दि.०८.०१.२०२४ रोजी १७.३०वा.पर्यत.

ई निविदा उघडणे : दि.१०.०१.२०२४ रोजी १४.00 वा.नंतर.

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.

१.वरील अंदाजित रक्कमेत जी.एस..टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस..टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस..टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.

२.http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील बेवसाईट वरती कळविण्यात येईल.)

३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफी केशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.

४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५२०८

जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ ३४३२ /२०२४ दिनांकः १८.१२.२०२४

सही

कार्यकारी अभियंता,

उत्तर मुंबई विद्युत विभाग,

सा.बां.विभाग, मुंबई.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता,

एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचेकार्यालय

Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com

दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६

ई-निविदा सुचना क्र.३७ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४-७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडून योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थांकडून (फक्त बृहन्मुंबई शहर) खालील कामांकरीत "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
| --- | --- | --- |
| १ | सर जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड, भायखळा मुंबई आय.एन.ई. येथे तिसऱ्या मजल्यावरील वसतिगृहाच्या खोल्या आणि शौचालयांची दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | २९६६९००/- |
| २ | सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, मुंबई येथे वर्ग ३ क्वार्टर्सचे फ्लोअरिंग प्रदान करणे. | २४४१३४३/- |
| ३ | जी.टी. रुग्णालय मुंबई येथील कॉम्प्लेक्स इमारतीची वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. हॉस्पिटल, मुंबई येथे दारे आणि खिडकीचे फिक्स्चर आणि फास्टनिंगची दुरुस्ती, सुतारकाम करणे. | १५३०८०८/- |
| ४ | सर जे.जे. मुंबई येथील पहिल्या मजल्यावरील प्रशासकीय इमारतीतील कर्मचारी टॉयलर आणि पुरुषांचे टॉयलेटचे अपग्रेडेशन आणि नूतनीकरणाचे काम करणे. | २११२०८५/- |
| ५ | रुग्णालयाची मुख्य इमारत, मुंबई येथे जेरीएट्रिक वॉर्डमध्ये रूग्णांचे शौचालय आणि कर्मचाऱ्यांचे शौचालय, आंघोळीची दुरुस्ती करणे. | १९८२०७०/- |
| ६ | सर जे.जे. येथील मेट्रॉन बिल्डिंगमध्ये उत्तरेकडील डाव्या बाजूच्या नर्सिंग वसतिगृहाच्या खोल्यांवर तिसऱ्या मजल्यावर फ्लोअरिंग, प्लास्टरिंग आणि पेंटिंगचे नूतनीकरण आणि दुरुस्ती. ग्रुप ऑफ हॉस्पिटल कंपाउंड, भायखळा, मुंबई. | १८७७३०३/- |
| ७ | ओल्ड स्मॉल कॉज कोर्ट मुंबई येथे निबंधक केबिन, पहिल्या मजल्यावर कार्यालय आणि चौथ्या मजल्यावर न्यायाधीश प्रसाधनगृह दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | १६३८२२६/ |

(एकूण ०७ कामे)

ई-निविदाउपलब्धकालावधी : दि. १९/१२/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दि.०२/०१/२०२५ रोजी १५.०० पर्यंत

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दि. ०६/०१/२०२५ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. १. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in ३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृतघटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/६९०५

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन,

२ रा मजला, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

दूरध्वनीक्र. ०२२-२२०१६९७४/७६

दिनांक : १६/१२/२०२४

कार्यकारी अभियंता,

एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,

मुंबई-४०० ००१.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५१२९

# दहिसरच्या राडारोडा प्रकल्पाला रहिवाशांचा विरोध, शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक पाटेकर पतीपत्नी यांनी प्रकल्पाच्या स्थळी येऊन विरोध दर्शवला

**मुंबई : राकेश गायकवाड**

दहिसरमध्ये मुंबई महापालिकेने सुरू केलेल्या राडारोडा प्रक्रिया प्रकल्पाला स्थानिकांनी विरोध केला आहे. प्रकल्प अजून पूर्ण क्षमतेने सुरूही झालेला नसताना हा प्रकल्प वादात सापडला आहे. या प्रकल्पाच्या पाहणीसाठी प्रसारमाध्यमांच्या दौऱ्यातच स्थानिक नागरिकांसह शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या माजी नगरसेवक पतीपत्नींनी प्रकल्पस्थळी येऊन प्रकल्पाला विरोध केला. प्रकल्पाच्या ठिकाणी रस्त्यांच्या सुविधा नसताना हा प्रकल्प सुरू केल्यामुळे स्थानिकांना गैरसोयींना सामोरे जावे लागते आहे, तसेच प्रदूषणही होत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण करावे व नंतर प्रकल्प चालवावा अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांना दिले.

घराघरातून बांधकाम व पाडकामातून निर्माण होणाऱ्या राडारोड्याच्या विल्हेवाटीसाठी मुंबई महापालिकेने दहिसर व कल्याण येथे असे दोन प्रकल्प सुरू केले आहेत. त्यापैकी दहिसर येथील प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी महापालिका प्रशासनाने प्रसार माध्यमांचा दौरा आयोजित केला होता. यावेळी परिसरातील काही महिलांनी प्रवेशद्वारावरच घेराव घातला होता. प्रसारमाध्यमांच्यासमोर या



प्रकल्पाला विरोध करण्यासाठी दहिसरच्या कोकणीपाडा परिसरातील नागरिक जमले होते. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक पतीपत्नी सुजाता व उदेश पाटेकर हे या नागरिकांसह घटनास्थळी विरोध करण्याकरीता आले होते. त्यामुळे पालिकेच्या अधिकाऱ्यांची मोठीच पंचाईत झाली. या प्रकल्पामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ पसरणार असून वायू प्रदूषणही वाढणार आहे, त्यामुळे या प्रकल्पाला आमचा विरोध असल्याचे मत यावेळी भारती तांडेल यांनी व्यक्त केले. तर कोकणीपाड्यावरील प्रकल्पाकडे जाणारा रस्ता हा अतिशय निमुळता आहे. या रस्त्यावरून एकावेळी एकच गाडी जाऊ शकते. त्यामुळे कंत्राटदाराने आधी रस्ता तयार करावा मगच प्रकल्प चालवावा असे मत चंद्रकांत परब यांनी मांडले. यावेळी बोलताना माजी नगरसेविका सुजाता पाटेकर म्हणाल्या की, या प्रकल्पाची दैनंदिन क्षमता ६०० टन राडारोडाची आहे. म्हणजे संपूर्ण मुंबईत राडारोडा आणण्यासाठी दररोज किती ट्रक या रस्त्यावरून येजा करणार याची कल्पना येईल. या रस्त्याची तितकी क्षमता नाही. तसेच भविष्यात या ठिकाणी राडारोडाबरोबरच कचराही आणला जाईल आणि याची कचराभूमी तयारी होईल, अशीही भीती त्यांनी व्यक्त केली.

## मुंबईत बहुमजली अतिसुरक्षित तुरुंग

**नागपूर: प्रथमेश चव्हाण**

मुंबईत एक बहुमजली अतिसुरक्षित तुरुंग आणि एक स्थानबद्धता केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. कैद्यांना मानवाधिकारातून आवश्यक सुविधा तुरुंगात मिळतील. पण बाहेर राहण्यापेक्षा तुरुंगात गेलेले बरे, असे वाटणार नाही, याचीही काळजी या सुविधा पुरविताना घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. कारागृह व सुधारसेवा असे स्वतंत्र दल उभारण्यात येईल आणि त्याच्या प्रमुखांचे पदनाम महासंचालक कारागृह व सुधारसेवा असे राहील, असे फडणवीस यांनी सांगितले. राज्याच्या नवीन तुरुंग अधिनियम विधेयकास विधानसभेने शुक्रवारी एकमताने मंजुरी दिली. सुरक्षा कर्मचारी, कैदी, त्यांचे अधिकार व सुविधा, खटल्यांची सुनावणी, शिक्षा, कैद्यांचे वर्गीकरण आदी विविध मुद्द्यांचा समावेश या अधिनियमात आहे. राज्यातील तुरुंगांसाठी सध्या कारागृह अधिनियम १८९४ आणि



बंदी अधिनियम १९०० हे ब्रिटिशकालीन कायदे लागू आहेत. आता काळानुरूप बदललेल्या आधुनिक गरजा, तंत्रज्ञान व अन्य बाबी लक्षात घेऊन केंद्र सरकारने आदर्श तुरुंग अधिनियम २०२३ तयार करून सर्व राज्यांना पाठविला. काही राज्यांनी तो तसाच स्वीकारला व काही राज्यांनी त्यात आवश्यक बदल करून तो अमलात आणला. राज्याने काही बदल करून नवीन अधिनियम प्रस्तावित केला असून हे विधेयक विधानसभेत चर्चेला होते. त्या वेळी अधिनियमाविषयी माहिती देताना फडणवीस म्हणाले, मी सनफ्रान्सिस्को येथील १०० वर्षे जुन्या अल्काट्राझ तुरुंग पाहिला आहे. या पाच-सहा मजली तुरुंगातून कोणीही कैदी पळून जाऊ शकलेला नाही. तिघांनी प्रयत्न केला, पण ते मरण पावले. राज्यातील अनेक तुरुंगांमध्ये क्षमतेच्या अनेकपट कैदी असून काही ठिकाणी कैदी आळीपाळीने झोपतात. हे मानवाधिकाराचे हनन आहे. त्यामुळे विदेशातील बहुमजली कारागृहांच्या धर्तीवर राज्यात नवीन बहुमजली व अतिसुरक्षित कारागृहे बांधली जातील.

## प्रकल्प सुरू होण्याआधीच निधीचे वितरण? पंतप्रधान आवास योजनेतील खासगी विकासकांना ५० कोटींचे वाटप झाल्याचा संशय

**मुंबई : विशाल कारंडे**

पंतप्रधान आवास योजने अंतर्गत खासगी विकासकाचा भागीदारी प्रकल्प सुरु होण्याआधीच राज्य आणि केंद्राच्या हिश्श्यापोटी ५० कोटींहून अधिक रकमचे वितरण झाल्याची शंका गृहनिर्माण विभागातील सूत्रांनी व्यक्त केली आहे. याबाबत गृहनिर्माण विभागाने 'महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणा'कडून (म्हाडा) तातडीने अहवाल मागविला आहे. राज्यात अशा पद्धतीने खासगी विकासकांचे प्रकल्प सुरू असून यापैकी काही प्रकल्प रद्द झालेले असतानाही पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या मोफत चटईक्षेत्रफळाचा लाभ घेतला जात असल्याचा आरोपही या सूत्रांनी केला. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत म्हाडा नियोजन प्राधिकरण असून आतापर्यंत केंद्रीय मान्यता आणि संनियंत्रण समितीने २५७ प्रकल्पांतर्गत तीन लाख २८ हजार ९७९ घरांना तत्त्वत: मंजुरी दिली आहे. यापैकी प्रत्यक्षात ११ प्रकल्पांना म्हाडाच्या नियोजन विभागाने मान्यता दिली असून



त्यांची बांधकामे प्रगतिपथावर आहेत. मात्र, उर्वरित प्रकल्पांना तत्त्वत: मंजुरी असतानाही या प्रकल्पांना केंद्र आणि राज्याचा वाटा वितरीत करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत सुरू असलेल्या बोरीपार्थी आणि दापोडी येथील अनुक्रमे ५०० आणि ४०० सदनिकांच्या प्रकल्पाला सुरुवात झालेली नसतानाही सात कोटी रुपये निधी वितरीत करण्यात आल्याची बाब प्राधिकरणाच्या सहआयुक्तांनीच निदर्शनास आणून दिली आहे. पंतप्रधान आवास योजनेत खासगी विकासकांसोबत भागीदारी केल्यास अडीच चटईक्षेत्रफळ मोफत मिळते. याशिवाय राज्याकडून एक लाख रुपये, तर केंद्र सरकारकडून दीड लाख रुपये असा अडीच लाखाचा निधी प्रत्येक सदनिकेपोटी वितरीत केला जातो. प्रकल्प रद्द झाल्यावर हा वितरीत झालेला निधी वसूल करणे आवश्यक आहे, तसेच पंतप्रधान आवास योजनेतील सवलतीही रद्द केल्या जातात. मात्र, तशी कार्यवाही काही प्रकल्पांबाबत करण्यात आलेली नाही, अशी माहिती गृहनिर्माण विभागाला आढळून आली आहे.

## आरोग्य केंद्रातील सहाय्यक परिचारिका प्रसविकांना दिलासा

**मुंबई : नितीन देवळेकर**

आरोग्य केंद्रामध्ये जूनमध्ये नियुक्त केलेल्या १७८ परिचारिकांच्या वेतनाचा मार्ग अखेर मोकळा झाला. यापैकी १३९ परिचारिकांचे जानेवारीमध्ये, तर उर्वरित ३९ परिचारिकांचे फेब्रुवारीमध्ये वेतन होईल, असे आश्वासन मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आले. आरोग्य विभागातील विविध कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी शुक्रवारी मुंबई महानगरपालिकेच्या एफ दक्षिण कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावेळी झालेल्या चर्चेत मागण्यांबाबत समाधानकारक तोडगा निघाला.

आरोग्य केंद्रांमध्ये परिचारिकांची कमतरता लक्षात घेऊन प्रशासनाने जूनमध्ये १७८ सहाय्यक परिचारिका प्रसविकांची नियुक्ती केली. मात्र या परिचारिकांचा सांकेतांक क्रमांक तयार करण्यास विलंब झाल्याने मागील सहा महिन्यांपासून त्यांचे वेतन रखडले होते. परिणामी त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. त्याचबरोबरच स्वच्छता निरीक्षक, कनिष्ठ अवेक्षक रिक्त पदे भरणे, कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवणे, संनिरीक्षण विभाग, क्षयरोग विभाग, कुटुंब कल्याण व माता बालसंगोपन विभागातील पदभरती, ड्रेसर व अन्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत म्युनिसिपल मजदूर युनियनच्या नेतृत्त्वाखाली कर्मचाऱ्यांनी एफ दक्षिण विभाग कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावेळी मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये १७८ पैकी १३९ परिचारिकांचे सहा महिन्यांसह डिसेंबरमधील वेतन जानेवारीमध्ये काढण्यात येईल. तर उर्वरित ३९ परिचारिकांच्या कागदपत्रांमध्ये



काही अडचणी असल्याने त्या तातडीने दूर करून त्यांचे वेतन फेब्रुवारीमध्ये काढण्यात येईल, असे आश्वासन आरोग्य विभागाकडून देण्यात आले. त्याचबरोबरच स्वच्छता निरीक्षक, कनिष्ठ अवेक्षक कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत २६ जानेवारीपर्यंत निर्णय घेण्यात येईल. तसेच ड्रेसर हे 'ड' वर्गात येत असल्याने त्यांना संगणकीय कामातून तसेच 'क' वर्गातील कर्मचाऱ्यांना औषधनिर्माण विभागातील कामातून तातडीने वगळण्याच्या सूचना आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी बैठकीत दिल्या, असे म्युनिसिपल मजदूर युनियनचे सहाय्यक सरचिटणीस प्रदीप नारकर यांनी सांगितले.

## राज्यातील आरोग्य व्यवस्थेवर कॅगचे ताशेरे

**मुंबई : सम्यक कासारे**

महाराष्ट्रामध्ये आरोग्य सेवा ही सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून पुरवली जाते. मात्र २०१६ ते २०२२ या पाच वर्षांमध्ये राज्यातील आरोग्य सेवेत अनेक त्रुटी असल्याचे कॅग अहवालातून उघडकीस आले आहे. मनुष्यबळ, औषधी द्रव्ये, औषधे, उपकरणांची उपलब्धता आणि आरोग्य सेवेच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात अभाव असल्याचे स्पष्ट करत राज्यातील आरोग्य सेवेवर कॅगने ताशेरे ओढले आहेत. २०१६ ते २०२२ या कालावधीतील आरोग्य सेवेतील सुविधा व पायाभूत सुविधांबाबतचा लेखापरीक्षणचा अहवाल कॅगमार्फत जाहीर करण्यात आला. यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके, २०१२ नुसार आवश्यकतेपेक्षा डॉक्टरांचे मंजूर संख्याबळ १७ टक्क्यांनी कमी असल्याचे म्हटले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामध्ये मनुष्यबळाचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्याचे मत लेखापरीक्षणात मांडले आहे. दोन्ही विभागांमध्ये डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी संवर्गात अनुक्रमे २७ टक्के, ३५ टक्के आणि ३१ टक्के कमतरता लेखापरीक्षणात अधोरेखित केली आहे. ट्रॉमा केअर सेंटर्समध्ये अनुक्रमे २३ टक्के आणि ४४ टक्के पदे रिक्त होती. आयुष महाविद्यालये आणि रुग्णालयांमधील डॉक्टर्स, परिचारिका आणि निम-वैद्यकीय संवर्गात अनुक्रमे २१ टक्के, ५७ टक्के आणि ५५ टक्के पदे रिक्त असल्याचे कॅगच्या अहवालात म्हटले आहे. सात जिल्ह्यांमधील ग्रामीण रुग्णालयांमध्ये नोंदणीसाठी दीर्घ





प्रतीक्षा कालावधी लागत होता. तसेच भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार, २६ टक्के डॉक्टर तपासावयाच्या किमान रुग्णासंख्येच्या दुप्पट रुग्ण तपासत होते. बहुतांश जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांमध्ये भिषक (जनरल मेडिसिन), सर्वसाधारण शस्त्रक्रिया, दंत सेवा तसेच रेडिओलॉजी आणि इमेजिंग सेवा उपलब्ध नसल्याचे अहवालात म्हटले आहे. बृहत आराखड्यानुसार नवीन आरोग्य सेवा संस्थांच्या बांधकामांची ७० टक्के अद्ययावतीकरणाची ९० टक्के कामे सप्टेंबर २०२२ पर्यंत अपूर्ण होती. तसेच, ४३३ कामे जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे सुरू करता आली नाहीत. याचा परिणाम आरोग्य सेवेवर होताना दिसून आला आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे राज्यातील सक्रीय नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांच्या वास्तविक संख्येची अचूक माहिती असणे अपेक्षित असताना वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नोंदणीकृत केलेल्या १ लाख ७१ हजार डॉक्टरांपैकी मार्च २०२२ पर्यंत ६८ हजार ६६५ डॉक्टरांची नोंदणी केली नव्हती.

पान १ वरुन...

### खातेवाटप झालं,...

सातारा जिल्ह्यात भाजपचे ४, शिंदेसेना आणि अजित पवार गटाचे प्रत्येकी २ आमदार आहेत. जास्त आमदारांच्या फॉर्म्युलानुसार साताराचे पालकमंत्रिपद भाजपकडे जाण्याची शक्यता आहे. मात्र मागील सरकारमध्ये पालकमंत्री राहिलेले शंभूराज देसाई हे यावेळीही पालकमंत्रिपदासाठी प्रयत्नशील आहेत.

छ. संभाजीनगर : मागील सरकारमध्ये शिंदेसेनेचे संदिपान भुमरे आणि ते लोकसभेवर निवडून गेल्यानंतर शेवटचे काही महिने शिंदेसेनेचेच अब्दुल सत्तार हे छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री होते. आता शिंदेसेनेचे ६ आणि भाजपचे ३ आमदार आहेत. त्यामुळे पालकमंत्री मीच होणार, असा थेट दावा शिंदेसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. तर दुसरीकडे अतुल सावे सलग तीन वेळा निवडून आल्याने तेच योग्य असल्याचा दावा भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

बीड : बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद पंकजा मुंडेंकडे जाणार की धनंजय मुंडेंकडे याबाबतही उत्सुकता आहे. यापूर्वी मंत्री असताना या दोघांनीही या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सांभाळले आहे. यावेळी बीडचे तापलेले वातावरण लक्षात घेता धनंजय मुंडेंना पालकमंत्रिपद देण्यास भाजपकडून तीव्र विरोध होत आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांच्याकडे पालकमंत्रिपद जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिक: नाशिक जिल्ह्यात अजित पवार गटाचे ७ आमदार आहेत. त्यामुळे ज्या पक्षाचे जास्त आमदार त्याच पक्षाचा पालकमंत्री या नियमानुसार आमच्याच पक्षाला पालकमंत्रिपद मिळावे, असा आमचा दावा असल्याचे अजित पवार गटाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे. भाजपचे नाशिकमध्ये ५ आमदार निवडून आले असल्याने जिल्ह्यात पक्षवाढीसाठी आणि आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने भाजपकडूनही नाशिक पालकमंत्रिपदासाठी आग्रह कायम आहे.

मुंबई : मुंबईत शिंदेसेनेचा एकही मंत्री नाही, तरीही आगामी महापालिका निवडणूक लक्षात घेता मुंबई शहर किंवा उपनगर जिल्ह्यांपैकी एका जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे, यासाठी शिंदे प्रयत्नशील आहेत. मागील सरकारमध्ये मुंबई शहरची पालकमंत्री म्हणून जबाबदारी भाजपचे मंगलप्रभात लोढा यांच्याकडे होती, तर उपनगरची जबाबदारी दीपक केसरकर यांच्याकडे होती. यावेळीही मुंबईतील एक जिल्हा आम्हाला मिळावा असा शिंदेंचा आग्रह आहे, मात्र भाजपला दोन्ही जिल्हे आपल्या ताब्यात हवे आहेत.

### वर्षभर काहीच प्रयत्न...

न्यायालयाने यावेळी एमपीसीबीला औद्योगिक प्रदूषण रोखण्यासाठी, तर वाहतूक विभागाला रस्त्यांवरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी काय कारवाई आणि उपाययोजना केल्या याचा अद्ययावत तपशील पुढील सुनावणीच्या वेळी सादर करण्याचे आदेश दिले. तत्पूर्वी, मुंबईतील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावून वायू प्रदूषणाची समस्या कशी चिंताजनक होत आहे हेही न्यायालयाने उदाहरण देऊन स्पष्ट केले. दक्षिण मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरात दूरवरील इमारती खराब दृश्यमानतेमुळे दिसतच नाहीत. ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांना श्वसनाच्या आजारांनी ग्रासले आहे. त्यामुळे, वायू प्रदुषणाच्या विखळ्यात अडकल्याचे भान ठेऊन आपण आताच त्यावर योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी, राज्य सरकार, महापालिका, एमपीसीबी यांनी एकत्रित काम करणे गरजेचे आहे. मुंबईला वायू प्रदूषणाचा विळख्यात पूर्णपणे अडकण्यापासून अरबी समुद्राकडून येणाऱ्या वाऱ्यांनी आतापर्यंत तारले आहे.

### हिंदुत्व आणि राममंदिराबाबत...

विचारांची दिशा नराचा नारायण घडवणारी असावी नराचा नराधम घडवणारी नसावी असं पुण्यात मोहन भागवत यांनी म्हटलंय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांच्या हस्ते पुण्यात लोकसेवा इ स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.


**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सुचना क्र.३९ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई ४०० ००१ दुरध्वनी क्र.०२२-२२०१६९७४/७६ हे खालील कामे **सा.बां. विभाग सुशिक्षित बेरोजगार अभियंता, यांचेसाठी मागवित आहेत.** कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयातून **दिनांक २०/१२/२०२४ ते दिनांक ०३/०१/२०२५ दुपारी १५.०० पर्यंत देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या निविदा ०६/०१/२०२५ रोजी त्यादिवशी दुपारी १५.०५ वाजेपर्यंत** स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | वर्ग | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत अंदाजित किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Reairing to internally Polymer, Plastering, and Painting to Passage Portion to Surgical Building at G.T. Hospital, Mumbai. | ८२४३४७ | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| २ | Repairing to Stone Masonary Wall Joint by Gently Cleaning tuck pointing and fising Ventilator window to OPD Building side Old Dr. Quarters Building G.T. Hospital Mumbai. | ८१०३०९/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/ |
| ३ | Repairing to Stone Masonary Wall Joint by Gently Cleaning tuck pointing and outer side portion near Garden portion to Old Dr. Quarters Building G.T. Hospital Mumbai. | ७८१७१७/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/ |
| ४ | Repairing to tuck pointing by gently Cleaning and to outer aise Portion to Complex side Portion and UG Water tank side Portion to Administrative Building at G.T. Hospital Mumbai. | ७६७३१०/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ५ | Repairing to internal plastering and painting and damage false ceiling work OPD 10 to 15 at 1st floor OPD Building at G.T. Hospital, Mumbai. | ८३०६२५/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ६ | Replastering and painting to Biochemistry Building at J.J. Hospital Compound, Mumbai. | ८४१८२१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ७ | Repairs and renovation tiling wall and flooring and miscellaneous work at T.B. Lab in skin V.D. Building at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ८००४१२/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ८ | Repairs and allied work plastering, painting, door and window at T.B. Lab on 2nd floor in Skin V.D. Building at Sir J.J. Group of Hospital, Mumbai. | ७९९६६७/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ९ | Repairs and renovation of HOD Cabin and staff rooms in Anatomy Building at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. | ७८४७८७/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १० | Annual Maintenance and minor repair works of Anatomy Building and Old Ladies Hostel Building at Sir J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai. (Duration Seven Months) | ८०२८३१/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| ११ | Annual Maintenance and minor repair works of Cowasji Jehangir Ophthalmology Building, Cowasji Jehangir Ophthalmology External (OPD) Building, Garage for Ambulance and Credit Society Office and Sir Jamshetji Duggun Govt. Eye Bank at Sir J.J. Hospital Compound, Mumbai. (Duration Seven Months) | ७८५१३५/- | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १२ | Annual Maintenance of OPD Building at G.T. Hospital, Mumbai. Repairs to fixtures and fastenings of doors and windows/Carpentry materials. (For 2024-25) | ७५०४३०/ | ८०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १३ | Annual Maintenance of High rise Building at G.T. Hospital, Mumbai. Repairs to fixtures and fastenings of doors and windows/Carpentry Materials. | ६६७४८७/- | ७०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १४ | Annual Maintenance of Low rise Building at G.T. Hospital, Mumbai. Repairs to fixtures and fastenings of doors and windows/Carpentry Materials. | ३५१०१६/- | ४०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १५ | Repairing to internally open to sky Portion (Office side above OT side) outer side Portion Polymer, Plastering, Painting to Chajja Portion 6th floor to 3rd floor to OPD Building at G.T. Hospital, Mumbai. | ८२५८०६/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |
| १६ | Repairing to internally open to sky part right side (Hostel side) Portion Polymer, Plastering, Painting to Chajja Portion 6th floor to 3rd floor to OPD Building at G.T. Hospital, Mumbai. | ८२३२०७/- | ९०००/- | वर्ग-७ व वरील | १०० दिवस | ब-१ | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, २ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सुचना फलकावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

जा.क्र.एघ(सा.बां.)वि/निविदा/ ६०६२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
२ रा मजला, बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, मुंबई.
दिनांक : १८-१२-२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५१६६

स्थळप्रत का. अ. यांनी मंजूर केली आहे

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

# जल्लोष करण्यासाठी ४१ टक्के भारतीयांची 'शॅम्पेन'ला पसंती, भारतात 'व्होडका' भेट देण्याचे प्रमाण ५० टक्के

■ **मुंबई : यश सावंत**

नववर्षाच्या स्वागतासाठी आणि जुन्या वर्षाला अलविदा करण्यासाठी जगभर जय्यत तयारी सुरू आहे. यानिमित्ताने पंचतारांकित हॉटेल, उपहारगृह, क्लबसह पर्यटनस्थळी गर्दी होणार असून फटाक्यांची आतषबाजीही होणार आहे. या पार्श्वभूमीवर कॉकटेल सेवनातील कल दर्शवणारा



बकार्डी लिमिटेडच्या सहाव्या वार्षिक अहवालाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. विशेष बाब म्हणजे बकार्डी लिमिटेडने यंदा अहवालात भारतीय ग्राहकांचाही समावेश केला आहे. या अहवालानुसार विशेष समारंभादरम्यान आनंद द्विगुणित करण्यासाठी ४१ टक्के भारतीय 'शॅम्पेन'ला पसंती देत आहेत, तर 'व्होडका' भेट म्हणून देण्याचे प्रमाण ५० टक्के आहे. भेट म्हणून 'स्कॉच व्हिस्की' देण्याचे प्रमाण ४५ टक्के आणि 'शॅम्पेन' देण्याचे प्रमाण ४० टक्के आहे.

अनेकदा आनंदाचा क्षण आपल्या प्रियजनांसोबत द्विगुणित करण्यासाठी आणि विजयाचा जल्लोष करण्यासाठी नागरिक पंचतारांकित हॉटेल आणि क्लबमध्ये जातात. त्या ठिकाणी जाऊन डीजेच्या तालावर मनसोक्तपणे थिरकतात आणि नवनवीन पदार्थांवर ताव मारून शीतपेयांसह कॉकटेलचेही सेवन करतात. तर काहीजण अधिक खर्च होऊ नये आणि कुटुंबियांसोबत वेळ घालवण्यासाठी घरीच पार्टी करणे पसंत करतात. बकार्डी लिमिटेडच्या अहवालानुसार एकूण भारतीयांपैकी ५४ टक्के नागरिक कुटुंबातील सदस्य आणि मित्रमंडळींसोबत कॉकटेलचे सेवन करत आहेत.

सध्या नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी जगभरातील नागरिक उत्सुक असून जय्यत तयारीही करण्यात आली आहे. दरम्यान, भारतातील ग्राहक नवीन हॉटेल, तसेच बारमध्ये जाऊन कॉकटेलचे सेवन करण्यास आणि तेथील वातावरण अनुभवण्यास उत्सुक आहेत. दरम्यान, बकार्डी लिमिटेडच्या अहवालानुसार ४५ टक्के नागरिक नवीन बार आणि रेस्टॉरंटमध्ये जाऊन कॉकटेलचे सेवन करणे पसंत करतात. तसेच ३२ टक्के नागरिक बिअरसोबत कॉकटेल घेणे पसंत करतात.

'भारतातील नागरिकांकडून कॉकटेलला पसंती मिळत असून यामध्ये नावीन्य आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सध्या नवनवीन बदल, ग्राहकांची ओळख व संशोधन करण्यासाठी बकार्डी लिमिटेडकडून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचाही वापर केला जात आहे. तसेच भारतातील बार व रेस्टॉरंट मालकांना मदत करण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर आहोत', असे बकार्डी लिमिटेडचे भारत आणि दक्षिण पूर्व आशियाचे व्यवस्थापकीय संचालक विनय गोलिकेरी म्हणाले.

# 'बीएआरसी'कडून आठ नवीन पिकांचे वाण विकसित, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी तांदूळ, तीळाच्या वाणांची निर्मिती

■ **मुंबई : विशाल कारंडे**

शेतीचा कायापालट करण्यासाठी, शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी, पिकांची लवचिकता वाढवण्यासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राने (बीएआरसी) विविध कृषी विद्यापीठांच्या सहकार्याने व्यावसायिक लागवडीसाठी आठ नवीन पिकांचे वाण विकसित केले आहेत. यात पाच तृणधान्ये आणि तीन तेलबियांच्या वाणांचा समावेश



आहे. 'बीएआरसी'ने ७० वर्षांच्या कारकिर्दीमध्ये आतापर्यंत ७० पीक जाती शेतकऱ्यांसाठी विकसित केल्या आहेत. दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागातील क्षार जमिनीसाठी 'ट्रॉम्बे कोकण खारा' हे तांदळाचे वाण विकसित केले आहे. या वाणामुळे खाऱ्या मातीमध्ये भातशेती करणे शक्य होणार असून भाताचे उत्पादन १५ टक्क्यांनी वाढण्यासही मदत होणार आहे. रायपूरमधील इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने छत्तीसगडमधील शेतकऱ्यांसाठी 'बौना लुचाई-सीटीएलएम' आणि 'संजीवनी' हे तांदळाचे दोन वाण विकसित केले आहेत. राजस्थानच्या शुष्क परिस्थितीत चांगले उत्पादन मिळावे, यासाठी उष्णता सहन करणारे आणि बुरशीजन्य रोगांना प्रतिरोधक असलेली 'ट्रॉम्बे जोधपूर गहू-१५३' ही जात जोधपूर कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित करण्यात आली आहे. 'ट्रॉम्बे राज विजय गहू १५५' ही जात मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेरमधील राजमाता विजयाराजे सिंधिया कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित केली. बीएआरसीद्वारे गव्हाचे वाण विकसित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. देशांतर्गत उत्पादनातून ४०-४५ टक्के तेलबियांची गरज भागवली जाते. तेलबियांच्या उत्पादनात 'आत्मनिर्भरता' साध्य करण्यासाठी मोहरी, तीळ आणि भुईमुगाचे उच्च उत्पन्न देणारे सुधारित वाण बीएआरसीने विकसित केले आहे. परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने गामा किरण विकिरण वापरून प्रथमच तीळाची 'ट्रॉम्बे लातूर तीळ-१०' ही जात विकसित केली आहे. यातून सुमारे २० टक्के अधिक उत्पन्न मिळणार आहे. राजस्थानसाठी जोधपूर कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने 'ट्रॉम्बे जोधपूर मस्टर्ड २' ही सध्याच्या वाणांपेक्षा १४ टक्के अधिक उत्पादन देणारे वाण विकसित करण्यात आले आहे. यात तेलाचे प्रमाण ४० टक्के आहे. रायपूरमधील इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने 'ट्रॉम्बे ग्राउंडनट ८८' हे भुईमुगाचे नवे वाण विकसित केले आहे.

# वित्तीय तूट वाढली

■ **मुंबई : गणेश बागडे**

चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार राजकोषीय तूट १ लाख १० हजार कोटींची आहे. याव्यतिरिक्त पावसाळी अधिवेशनात ९४ हजार ६१० कोटी



तर हिवाळी अधिवेशनात ३५ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. यामुळे राजकोषीय आणि वित्तीय तूट ही सव्वादोन लाख कोटींवर गेली आहे. यामुळेच निवडणुकीपूर्वी विविध सवलतींची खैरात करणाऱ्या महायुती सरकारला वित्त विभागाने सावध केले होते. वित्तीय तूट ही राज्य स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्के अपेक्षित असते. अशीच परिस्थिती राहिल्यास वित्तीय तूट वाढण्याची भीतीही वित्त विभागाने व्यक्त केली होती. वाढती तूट लक्षात घेता नवीन स्त्रोत शोधून महसुलात वाढ करणे आवश्यक आहे. यातूनच फडणवीस यांनी नवीन स्त्रोत शोधण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा लोकप्रिय घोषणांमुळे तिजोरीवर ताण आला आहे. विकास कामांवरील निधीत कपात करण्याशिवाय पर्याय नसल्याचे वित्त विभागाच्या उच्चपदस्थांचे म्हणणे आहे. यापुढील काळातही विकासकामांसाठी फारसा निधी उपलब्ध होणे कठीण असल्याचे बोलले जाते.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**

**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**

E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**निविदा सुचना क्र. ३९ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत **मुंबई जिल्हयातील व मुंबई उपनगर जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता** खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- **२०/१२/२०२४** ते दिनांक- **०३/०१/२०२५** कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- **०६/०१/२०२५** दुपारी १७.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | विशेष दुरुस्ती अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल युनिट क्र. २३ येथील गिलावाचे काम करणे. | रु. ५०५२३६/- |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत उत्तरेकडील प्रवेशद्वार ते अप्पर पोलिस महासंचालक कार्यालय पर्यंत आवारभिंतीची व इतर बांधकामाची रंगरंगोटी करणे. | रु.५०४५८४/- |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल युनिट क्र. २३ येथील परेड मैदानाचे नुतनीकरण करणे. | रु.३३६४५०/- |
| ४ | राज्य राखीव पोलिस बल, गोरेगाव (पू) मुंबई येथील सांस्कृतिक हॉल ते रेस्ट हाऊस दरम्यानच्या रस्त्यावरील डागडुजी करणे. | रु. ८४२२५७/- |
| ५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ३२, पोलीस उप निरिक्षक निवासस्थाने, ८ पोलीस निरिक्षक निवासस्थाने, १० पोलीस निरिक्षक निवासस्थाने, कार्टर रोड, वांद्रे (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे. | रु.३५१४९४/- |
| ६ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ५४ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, ए इमारत २१ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, बी इमारत वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प) येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३१५२५७/- |
| ७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने, सी इमारतवॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३०२६९९/- |
| ८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने डी इमारत वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३०२५८२/- |
| ९ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४८ पोलीस कर्मचारी निवासस्थाने इ इमारत वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३२५४८५/- |
| १० | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४० पोलीस कर्मचारी निवासस्थाने एफ इमारत वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३९९८३१/- |
| ११ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत २ पोलीस अधिकारी निवासस्थाने ६ सफाई कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), जी इमारत, अतिरिक्त पोलीस आयुक्त निवासस्थान,उप पोलीस आयुक्त निवासस्थान, वॉटरफिल्ड रोड, वांद्रे (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.२६१४७७/- |
| १२ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत १६ पोलीस उप निरिक्षक निवासस्थाने, सरस्वती रोड, मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.४६९७४७/- |
| १३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६ ब्लॉक पोलीस कर्मचारी निवास्थाने, सांताक्रुझ (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.५२१३००/- |
| १४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत १८, पोलीस उप निरिक्षक, निवासस्थाने, सांताक्रुझ (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.१३२११८/- |
| १५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत नंदागिरी विश्रामगृह, विलेपार्ले (पू), मुंबई.येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४९८५८०/- |
| १६ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ५४ पोलीस निवासस्थान अंधेरी (पुर्व) मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.७४३५८६/- |
| १७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत "सी" ईमारत हंजरनगर अंधेरी (प), मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.४१२५२०/- |
| १८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत "यु" ईमारत हंजरनगर अंधेरी (प), मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.३७७८९६/- |
| १९ | मजासवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील ३३२ पोलीस वसाहत इमारत क्र. १७ -ब आणि मेघवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील इमारत क्र. ७, ८ व ९ चे वार्षिक देखभाल दुरुस्ती व आवश्यक स्थापत्य कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५०९३१५/- |
| २० | मजासवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील ७४७ पोलीस वसाहत इमारत क्र. ५ अ, ५ ब व ६ अ ६-ब चे वार्षिक देखभाल दुरुस्ती व आवश्यक स्थापत्य कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.८३९८२९/- |
| २१ | मजासवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील ७४७ पोलीस वसाहत इमारत क्र.१०-अ, १०-ब, १०-क व १३-अ चे वार्षिक देखभाल दुरुस्ती व आवश्यक स्थापत्य कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.८३९२३५/- |
| २२ | मजासवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील ७४७ पोलीस वसाहत इमारत क्र. १३-ब व ३३२ पोलीस वसाहत इमारत क्र. ९-अ, ९-ब व १७-अ चे वार्षिक देखभाल दुरुस्ती व आवश्यक स्थापत्य कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.८३९५२१/- |
| २३ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, १०० पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३ 'अ',३'ब', ४,'अ',४'ब',४'क' व २२४पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र.३६'ड', ३७'अ',३७'ब' मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५१७८९३/- |
| २४ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, १७६ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३८ 'अ', ३१"अ' , ३२ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र.३९"अ', ३९'ब', ३५'अ', ३५'ब' व २२४ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३१'ब' मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५८२६१४/- |
| २५ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, १७६ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३८ 'ब', ३८'क', ३८'ड', २९'अ', २९'ब', २९'क' मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५३९३८६/- |
| २६ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, १७६ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३० 'अ',३०'ब', ३०'क' व फोर्स वन मुख्यालय , गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील निवासी इमारत क्र.०४ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५५३६६६/- |
| २७ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, २२४ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३२ 'अ',३२ 'ब', ३३ 'अ', ३३'ब', ३३'क',३४'अ' मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५५९६४६/- |
| २८ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, २२४ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३४ 'ब', ३६अ, ३६ब व फोर्स वन मुख्यालय , गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील निवासी इमारत क्र.०६ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.४६३०८७/- |
| २९ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.८, गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५, २२४ पोलीस निवासस्थाने येथील इमारत क्र. ३६ 'क' व फोर्स वन मुख्यालय , गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील निवासी इमारत क्र.०३ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.४७७८११/- |
| ३० | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, फोर्स वन मुख्यालय , गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील निवासी इमारत क्र.०२ आणि इमारत क्र. ०५ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५७००२५/- |
| ३१ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत १२६ पोलीस वसाहत, इमारत क्र ३, आरे वनराई, गोरेगाव (पू.) व १०८ पोलीस वसाहत, वर्ग-३, इमारत क्र ई व एफ, १०८ पोलीस वसाहत, वर्ग-२ इमारत क्र. जी मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.८१९८६०/- |
| ३२ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत १२० पोलीस वसाहत, वर्ग-४ इमारत क्र १, तीन डोंगरी, गोरेगाव (पू.) व १०८ पोलीस वसाहत, वर्ग-३, इमारत क्र ई व एफ, १०८ पोलीस वसाहत, वर्ग-२ इमारत क्र. जी मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.७९५९८०/- |
| ३३ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत १२६ पोलीस वसाहत, इमारत क्र २, आरे वनराई, गोरेगाव (पू.) ४० पोलीस वसाहत, इमारत क्र. १०, शास्त्री नगर, १०८ पोलिस वसाहत, वर्ग-३, इमारत सी, डी & १०८ पोलिस वसाहत, वर्ग-४, इमारत एच, गोरेगाव (प.) व मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.८२४९१०/- |
| ३४ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत 96 पोलीस वसाहत इमारत क्र 1 ए व 2 ए, मालाड (प.) व 20 सुंदरम, मालाड (पू.), पोईसर शेड, कांदिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.४६९८७४/- |
| ३५ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत 156 पोलीस वसाहत, टाईप 1 इमारत 1,2,3,4 व टाईप ३ इमारत ४ कांदिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.५७३६९८/- |
| ३६ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत 156 पोलीस वसाहत, टाईप २ इमारत 4 व टाईप ३ इमारत ४ कांदिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.६२१८८५/- |
| ३७ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ९८ शासकिय निवासस्थाने, योगीनगर बोरीवली येथील इमारत क्र.५५-अे,बी, & ५५,५६-सी व ५६-डी, इ येथील दैनंदिन कचरा उचलणे, जिन्याची तसेच इमारतीच्या बाहयभागाची साफसफाई व कचरा वाहतुक करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.३८७७८६/- |
| ३८ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ११२ पोलीस वसाहत, इमारत ५३ व ५४, योगीनगर, बोरिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.७७९८४५/- |
| ३९ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ४० पोलीस वसाहत, इमारत B-१ व B-२, बोरिवली (प.), ७२ पोलीस वसाहत, नाटकवाला लेन बोरिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.७३८७९२/- |
| ४० | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ५० पोलीस वसाहत, योगीनगर, २० पोलीस वसाहत, बोरिवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.४७४९२३/- |
| ४१ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ९८ पोलीस वसाहत, इमारत ५५ & ५६, योगीनगर, बोरिवली (प.) & 3 रूम दहिसर ओरीपाडा मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (कालावधी-मार्च २०२५ पर्यंत) | रु.४७७९१०/- |
| ४२ | प्रकार - २, ३ व ४ राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु.८२२४५०/- |
| ४३ | प्रकार - ५ व बाहयरुग्ण विभाग इमारत राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु.४२७९५०/- |
| ४४ | परिचारीका वसतीगृह, मेडीकल कॉन्सील, जागतीक बँक प्रकल्प इमारत, भांडार व शाळेची इमारत राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार मुलुंड मुंबई येथे वार्षिक दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | रु.८०९६५०/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/११७०३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- 1 3 DEC 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५१६९

# कल्याणमधील मारहाण प्रकरणातील आरोपी अखिलेश शुक्लासह इतर आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी

**कल्याण : विशेष प्रतिनिधी**

कल्याण येथील योगीधाम अजमेरा हाईट्स संकुलातील एका कुटुंबाने (शुक्ला) धूप अगरबत्ती लावली आणि त्या धुराचा त्रास होतो या कारणामुळे त्यांच्या शेजाऱ्यांशी भांडण झालं. या इमारतीतील अखिलेश शुक्लाच्या कुटुंबाने त्यांच्या शेजाऱ्यांबरोबर वाद घातला. या वादाचं रुपांतर मोठ्या हाणामारीत झालं. शुक्लाने गुंडांची टोळी बोलावून शेजारी राहणाऱ्या देशमुख कुटुंबाला मारहाण केली. यामध्ये दोन जण जबर जखमी झाले आहेत. शुक्ला व त्याच्या १० गुंडांनी मराठी कुटुंबियांना बेदम मारहाण करत धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. मराठी समुदायाचा उल्लेख करत शिवीगाळ केली. त्यानंतर देशमुख कुटुंबाने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी सुरुवातीला देशमुख कुटुंबाची फिर्याद नोंदवण्यास टाळाटाळ केली. अखेर नागरिकांच्या रोषानंतर पोलिसांनी शुक्लाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतलं. तसेच त्याने बोलावलेल्या गुंडांच्या टोळीतील सहा जणांना ताब्यात घेतलं. दरम्यान, पोलिसांनी आज शुक्ला व त्याच्या साथीदारांना न्यायालयासमोर हजर केलं. त्यानंतर न्यायालयाने शुक्ला व त्याच्या साथीदारांची सहा दिवसांसाठी पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करून, शुक्लासह त्याच्या साथीदारांची चौकशी करून सहा दिवसांनी न्यायालयासमोर साक्षीपुरावे सादर करतील. कल्याण मारहाण प्रकरणातील अखिलेश शुक्ला, त्याची पत्नी गीता व इतर चार आरोपींना कल्याण न्यायलयात उभे करण्यात आले होते. शुक्ला पती-पत्नीसह चार जणांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात जाणून-बुजून वाद निर्माण केला जात आहे, मराठी-हिंदी असा काही वाद नाही, असं आरोपीचे वकील अनिल पांडे म्हणाले. आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये अगरबत्ती लावण्यावरुन वाद झाले होते त्यानंतर मारहाण करण्यात आली. उर्वरीत आरोपी फरार आहेत, त्यांचा शोध चालू आहे. या प्रकरणामुळे प्रांतवाद सुरु झाला आहे त्याकडे सरकारने लक्ष द्यावे, असे फिर्यादीचे वकील हरीश सरोदे म्हणाले. आरोपीचे वकील अनिल पांडे म्हणाले, 'अखिलेश शुक्ला यांना सहा दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. फिर्यादींच्या बाजूने मराठी-अमराठी असे अनावश्यक मुद्दे मांडण्यात आले. हे दुर्दैवी आहे. असं काही घडलंच नाही. केवळ धूप-अगरबत्तीमुळे वाद झाला होता.



# सातारा पोलीसांची मोठी कारवाई; बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्याला पकडले

**सातारा : विशेष प्रतिनिधी**

मसूर (ता. कराड ) येथे अवैधरित्या गावठी पिस्तूल बाळगल्याप्रकरणी एकला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई सातारा स्थानिक गुन्हे शाखा आणि मसूर पोलिसांनी संयुक्तरीत्या केली आहे. संदेश सतिश ताटे (वय १९ रा. ओगलेवाडी, ता. कराड जि. सातारा) असे ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंतवडी (ता. कराड) गावच्या हद्दीत मसूर ते शामगाव जाणाऱ्या रस्त्यावर एक जण मोटरसायकलवरून मिस्टर घेऊन येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना बातमीदारमार्फत मिळाली होती त्यानुसार त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पथकास सूचना देऊन संबंधित परिसरात कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या. दिनांक १६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील आणि त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पथकाने अंतवडी (ता. कराड) गावच्या हद्दीत मसूर-शामगाव रस्त्यावर मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचला. एक जण मोटरसायकल वरून येताना पथकला दिसला. त्याला जागीच पकडून त्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्तूल, एक जिवंत काडतूस आणि एक मोटर सायकल असा १ लाख २५ हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल मिळाला. या युवकाविरुद्ध मसूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा पोलीस दलाकडून नोव्हेंबर २०२२ पासून ते आजपर्यंत १०४ देशी बनावटीची पिस्तूल, चार बारा बोअरच्या बंदुका, दोन रायफल, २३१ जिवंत काडतुसे, ३८३ रिकाम्या पुंगळ्या आणि चार मॅग्झिन जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत पोलीस अधीक्षक समीर शेख अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील, रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, पारितोष दातीर, सचिन साळुंखे, साबीर मुल्ला, मंगेश महाडिक, लक्ष्मण जगधने, हसन तडवी, सनी आवटे, मुनीर मुल्ला, अमित झेंडे, अजय जाधव, राजू कांबळे मनोज जाधव, धीरज महाडिक, अमृत कर्पे, वैभव सावंत, तसेच मसूर पोलीस ठाण्याकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ खरात, पोलीस अंमलदार महेश लावंड, अमोल पवार, महेश घुटूगडे, विक्रम पोतेकर यांनी सहभाग घेतला.



# घरफोडी करणाऱ्या आरोपीला २४ तासात अटक; माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई

**वसई : विशेष प्रतिनिधी**

खिडकीवाटे घरात प्रवेश करून साडेआठ लाखांचे दागिने चोरणाऱ्या चोराला माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अवघ्या २४ तासात अटक केली आहे. आरोपीकडून चोरीचा सर्व मुद्देमाल परत मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे. १३ डिसेंबर रोजी वसई पश्चिमेच्या बाभोळा परिसरातील कौल हेरिटेज सिटी येथे राहणाऱ्या कमलेश तावडे यांच्या घरात साडेआठ लाखांची चोरी झाली होती. अज्ञात चोराने खिडकीतून प्रवेश करून ही चोरी केली होती. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने परिसरातील १०० हून अधिक सीसीसीटीव्ही तपासून आरोपी सन्नी सुनिल निवाते (२७) याला वसईच्या स्टेला येथून अटक करण्यात आली. त्याने चोरलेले सोन्याचे दागिने, महागडे घड्याळ आदि. साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. अवघ्या २४ तासात पोलिसांनी तत्परतेने तपास करून चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरोधात आचोळे पोलीस ठाण्यात ३ गुन्ह्यांची नोंद आहे. ही कारवाई परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिलाल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सनिल पाटील, शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे आदींच्या पथकाने केली.



# बनावट नोटा चलनात आणण्याचा प्रयत्नात असलेल्या गुजरातमधील तरुणाला पुणे पोलिसांनी केली अटक

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

शहराच्या मध्यवर्ती भाग असलेल्या रस्ता पेठेत बनावट नोटा बाळगणाऱ्या एकाला समर्थ पोलिसांनी अटक केली. अटक करण्यात आलेला आरोपी हा गुजरातमधील जामनगरचा आहे. त्याच्याकडून ५०० रुपये दराच्या १४२ आणि शंभर रुपये दराच्या ६१ अशा ७७ हजार रुपयांच्या बनावट आणि हुबेहूब दिसणाऱ्या नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. गौरव रामप्रताप सविता ( वय २४, रा. जामनगर, गुजरात) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई लखन गंगाधर शेटे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, समर्थ पोलिसांनी शुक्रवारी रात्री कोंम्बिंग ऑपरेशन राबवले होते. यावेळी समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक उमेश गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पथक हद्दीतील लॉजेस तपासत होते. त्यावेळी एकजण हा रस्ता पेठेतील उंटाड्या मारुती मंदिराजवळ थांबला असून त्याच्याकडे बनावट नोटा असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानूसार पोलीस पथक तेथे गेले. पोलिस आल्याची चाहूल लागताच आरोपी तेथून निघून जाऊ लागला. मात्र त्याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याची अंगझडती घेण्यात आली. त्यावेळी त्याच्याकडे ५०० रुपये दराच्या १४२ आणि शंभर रुपये दराच्या ६१ अशा ७७ हजार २०० रुपये रकमेच्या बनावट नोटा आढळल्या. त्यानुसार पोलिसांनी गौरव याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करण्यात येत आहे.



# पुणे पोलीसांची कारवाई, टेम्पो अडवून १८ लाखांचा गुटखा केला जप्त

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

पुण्यात बंदी असणाऱ्या गुटख्याला मोठी मागणी असल्याचे तसेच तो गुटखा अवैधरित्या विक्री अन् त्याची वाहतूक करणाऱ्यांची साखळी मोठी आहे. गेल्या काही दिवसांपासून पोलिसांकडून सातत्याने गुटखा पकडला जात आहे. मात्र, हे गुटखा डिलर मोकळेच राहत असल्याचे दिसत आहे. स्वारगेट पोलिसांनी पंधरा दिवसात दुसऱ्यांदा गुटखा पकडला आहे. याप्रकरणी दोघांना अटक करत १८ लाखांचा गुटखा पकडला आहे. सौरभ उर्फ धनराज रामकृष्ण निंबाळकर (वय २४, रा. थोरवे शाळेसमोर, कात्रज), संग्राम बाळकृष्ण निंबाळकर (वय २६) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यावर भारती विद्यापीठ पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक युवराज हांडे, कुंदन शिंदे, राहुल तांबे, सागर केकाण, महेश बारवकर, मितेश चोरमोले यांच्या पथकाने ही कारवाई केली. राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांची विक्री आणि वापरास बंदी घालण्यात आली आहे. गुटखा बंदी असताना शहरातील पानपट्टयांवर गुटखा विक्री होत आहे. २० डिसेंबर दुपारी भारती विद्यापीठ परिसरातील फालेनगर येथून गुटखा वाहतूक होणार असल्याची माहिती स्वारगेट पोलिसांना मिळाली. पथकाने लागलीच सापळा रचला. तसेच टेम्पो अडवला. टेम्पोची तपासणी करण्यात आली. तेव्हा टेम्पोत गुटख्याचा साठा आढळून आला. अटक करण्यात आलेले दोघे जण भाऊ असून त्यापैकी एकाविरुद्ध यापूर्वी ग्रुहे दाखल झाले आहेत. दोघांनी शहरात गुटखा विक्री करण्यासाठी आणला होता. गुटखा कोठून आणला, यादृष्टीने पोलीस तपास करत आहेत. गुटखा बंदी असताना देखील पुण्यासारख्या शहरात गुटख्याची विक्री अन् वाहतूक खुलेआम होत असून वारंवार पोलिसांकडून गुटखा पकडला जात असताना गुटखा एजंट मात्र सुसाट सुटल्याचे दिसत आहे. या प्रतिबंधित पदार्थाच्या बंदीची अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत पोलीस विभागाच्या सहाय्याने होते. असे असताना पुण्यात मात्र, गुटखाबंदी ही कागदावरच असल्याचे स्पष्ट होत आहे. अनेक कारवायांमधून हे अधोरेखित देखील झाले आहे. शहरातील छोट्या मोठ्या टपऱ्यांवर सहजरीत्या गुटखा उपलब्ध होत आहे. पुणे शहरात अवैध व्यवसायासह गुटखा विक्री तसेच वाहतूक करणाऱ्यांवर पोलीस आयुक्तांनी कारवाईचा इशारा दिला होता. यापुर्वी पोलिसांनी पुण्यासह परराज्यात देखील गुटखा एजंटची धरपकड केली होती. त्यानंतर ही साखळी प्रथमच समोर आली होती. काही दिवस गुटख्याची चणचण जाणवल्यानंतर मात्र, आता शहरात गुटखा वाहतूक आणि विक्रेत्यांचे हे रॅकेट खुलेआम सुरू आहे. स्थानिक पोलीस, गुन्हे शाखेची पथके वॉच ठेवत असताना हे प्रकार नक्की कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.



# मिरा भाईंदर पालिका आयुक्तांचे बनावट व्हॉट्सअप; अधिकाऱ्यांकडेच पैशांची मागणी

**भाईंदर: विशेष प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर यांच्या नावाचे बनावट व्हाट्सअप्प क्रमांकावरून पैसे मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. पालिकेने प्रसिद्धी पत्रक काढून अशा कोणत्याही संदेशाला बळी न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. देशभरात सायबर गुन्हाच्या प्रकरणात मोठी वाढ झाली आहे.यात एखाद्या व्यक्तीच्या नावे बनावट मोबाईल क्रमांक तयार करून पैसे उकळण्याचे काम हे सायबर भामटे करत असतात. आता या भामट्यानी चक्क मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर यांच्या नावे बनावट व्हाट्सअप क्रमांक (९१-७०६९४५८२०६) तयार केला आहे.आणि पालिकेच्याच अधिकाऱ्यांना व शहराती प्रतिष्ठित नागरिकांकडे पैश्याची मागणी करण्यात येत आहे.त्यामुळे अशा संदेशाला बळी न पडता थेट पोलिस ठाण्यात तक्रार करावी असे आवाहन पालिकेच्या जनसंपर्क विभागाकडून करण्यात आले आहे.



# रिक्षाचालकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग; फरार रिक्षाचालकाच्या शोधासाठी पथक स्थापन

**वसई : विशेष प्रतिनिधी**

रिक्षात बसलेल्या १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला निर्जनस्थळी नेऊन एका रिक्षाचालकाने विनयभंग केल्याची धक्कादायक घटना नायगाव मध्ये घडली आहे. माणिकपूर पोलिसांनी या रिक्षाचालकाची ओळख पटवली असून त्याच्या शोधासाठी पथके तयार केली आहेत. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

पीडित मुलगी १६ वर्षांची असून नायगाव मध्ये राहते. शुक्रवारी ती आई बरोबर खरेदीसाठी गेली होती. खरेदी झाल्यानंतर ते दोघे नायगाव स्थानकात आले. आईने काम असल्याने पीडित मुलगी एकटीच घरी जाण्यासाठी निघाली. नायगाव स्थानकाच्या पश्चिमेला उतरून तिने घरी जाण्यासाठई रिक्षा केली. संध्याकाळी ६ च्या सुमारास ती रिक्षात बसली होती. ती रिक्षात एकटीच होती. रिक्षाचालकाने रिक्षा अन्य ठिकाणी वळवली. नेहमीचा रस्ता नसल्याने मुलीला संशय आल्यावर रिक्षाचालकाने उडवाउडवीची उत्तरं दिली. यानंतर त्याने उमेळमान येथील मिठागराच्या निर्जन जागेवर त्याने रिक्षात बिघाड झाल्याचे कारण देत थांबवली. यानंतर मागील बाजूस येऊन त्याने अंधाराचा फायदा घेत पीडित मुलीचा विनयभंग केला. या घटनेमुळे पीडित मुलगी प्रचंड घाबरली होती. तिने घरी जाऊन आईला हा प्रकार सांगितला. याप्रकरणी तिच्या पालकांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी रिक्षाचालकाची ओळख पटवली असून त्याचे नाव प्रकाश वर्तक असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याविरोधात माणिकपूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७५(१) तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा (पोक्सो) अधिनियमाच्या कलम १, १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे नायगाव मध्ये संतापाची लाट पसरली आहे. रिक्षाचालकांकडूनच प्रवासी म्हणून बसलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



# बनावट देशी-विदेशी मद्य निर्मिती कारखान्यावर छापा; ७० लाखाचा मुद्देमाल जप्त

**नाशिक : विशेष प्रतिनिधी**

मनमाड रोडवरील घोडेगाव शिवारात सुरू असलेल्या बनावट देशी-विदेशी मद्य निर्मिती कारखान्याचा छडा लावण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाला यश आले आहे. या कारखान्यावर टाकलेल्या छाप्यात चार जणांना ताब्यात घेण्यात आले असून सुमारे ७० लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संशयितांमध्ये तीन परप्रांतीयांचा समावेश आहे. नाताळ व नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर मद्य खरेदीसाठी मद्यप्रेमींचा उत्साह ओसंडून वाहत असतो. ही संधी साधून नामवंत कंपन्यांच्या नावाखाली बनावट देशी-विदेशी मद्याची निर्मिती करून त्याची बाजारात विक्री करण्याचा प्रयत्न असल्याची गोपनीय माहिती मालेगाव येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक लीलाधर पाटील यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, उपायुक्त उषा वर्मा, अधीक्षक शशिकांत गर्जे, उपअधीक्षक अमृत तांबारे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही कारवाई केली आहे. एका शेतातील हिरवी नेट व त्यावर काळ्या ताडपत्रीने बंदिस्त असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये बनावट मद्यनिर्मिती होत असल्याचे या पथकाला आढळून आले आहे. हे मद्य रॉयल स्टॅग व रॉकेट संत्रा या कंपनींची निर्मिती आहे, हे भासविण्यासाठी संबंधित नावाच्या बाटल्यांमध्ये हे बनावट मद्य भरुन त्या बाटल्या खोक्यांमध्ये ठेवण्यात आल्याचेही पथकाला आढळले. हा सर्व मुद्देमाल तसेच या ठिकाणी असलेला कच्चा माल, बॉटलिंग यंत्र, पाणी गाळप यंत्र, देशी-विदेशी मद्याच्या बाटल्यांची जिवंत बुचे, देशी-विदेशी मद्याच्या रिकाम्या बाटल्या, देशी-विदेशी मद्याच्या नावांचे कागदी लेबल, पिकअप वाहन आदी ऐवज पथकाने जप्त केला. या प्रकरणी भंगी पवार (३०, रोहिणी, शिरपूर,धुळे), किरण चव्हाण (२३), प्रकाश बारेला (३५) व रांतीलाल बारेला (४२, तिन्ही बडवाणी, मध्यप्रदेश) या संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करून पथकाने त्यांना ताब्यात घेतले आहे. बनावट मद्यनिर्मितीसाठी लागणाऱ्या साहित्याचे पुरवठादार, कारखान्यासाठी जागा व अन्य सुविधा उपलब्ध करून देणारे मालक, वाहन मालक, मद्य खरेदीदार अशा घटकांचा आता उत्पादन शुल्क विभागातर्फे शोध घेण्यात येत आहे. पथकात निरीक्षक लीलाधर पाटील, दुय्यम निरीक्षक हर्षराज इंगळे, सागर नलवडे, रियाज शेख, अमोल भडांगे, दिलीप महाले आदींचा समावेश होता.



# ठाणे ते दिवा आणि एरोली भागात तीन वर्षांत सुमारे चार हजार मोबाईल चोरी, दररोज सरासरी तीन ते चार मोबाईलची चोरी

**ठाणे : विशेष प्रतिनिधी**

मध्य रेल्वे स्थानकातील प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत असताना चोरीच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. ठाणे ते दिवा आणि ऐरोली ते दिघा या रेल्वे स्थानकांमध्ये मागील तीन वर्षात ३ हजार ८७३ मोबाईल चोरीला गेले आहेत. याची सरासरी केल्यास तीन ते चार मोबाईची दिवसाला चोरी होत आहे. तर १ हजार ४९४ प्रकरणांचा उलगडा करणे पोलिसांना शक्य झाले आहे. स्थानक परिसरातील चोरट्यांचा सुळसुळाट आणि प्रवाशांचा निष्काळजीपणा यामुळे मोबाईल चोरीच्या घटना समोर येत आहेत.

ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात मध्य रेल्वेचे ठाणे ते दिवा रेल्वे स्थानक आणि ट्रान्सहार्बर मार्गिकेचे ऐरोली ते दिघा हे रेल्वे स्थानक येतात. या रेल्वे स्थानकांमध्ये १ जानेवारी २०२२ ते १९ डिसेंबर २०२४ या कालावधीत ३ हजार ८७३ चोरीची प्रकरणे समोर आली आहे. या प्रकरणाची सरसरी काढल्यास दररोज सरासरी तीन ते चार मोबाईलची चोरी होत आहे. रेल्वे डब्यात, फलाटावर प्रवाशांच्या नकळत त्यांच्या खिशातून मोबाईल चोरीला जातात. तर काही प्रकरणांमध्ये प्रवाशांकडून मेल एक्स्प्रेस रेल्वेगाड्या, स्थानक परिसरातील प्रतिक्षालयात मोबाईल चार्जिंगला ठेवून प्रवासी झोपी जातात. त्या कालावधीत चोरट्यांकडून मोबाईल चोरी होत असल्याचे पोलिसांनी सांगितले. मागील तीन वर्षांपैकी २०२२ मध्ये १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत १ हजार ४९७ मोबाईल चोरीच्या घटना घडल्या. तर ५५० प्रकरणे उघडकीस आले. याच कालावधीत २०२३ मध्ये १ हजार २६६ मोबाईल चोरीला गेले. तर ५१८ प्रकरणे उघडकीस आणण्यास पोलिसांना शक्य झाले. २०२४ मध्ये १ जानेवारी ते १९ डिसेंबर या कालावधीत १ हजार ११३ मोबाईल चोरीच्या घटना घडल्या. तर ४२६ प्रकरणे उघडकीस आले.




# मुंबईतील १२ पैकी आठ समुद्रकिनारे धोकादायक

## गिरगाव आणि जुहू चौपाटी पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित

■ मुंबई : गणेश वागडे

मुंबईला भेट देणाऱ्या देश-विदेशांतील पर्यटकांसाठी शहर आणि उपनगरांतील समुद्रकिनारे आकर्षण ठरत आहेत. यातील आठ समुद्रकिनारे धोकादायक ठरले आहेत, तर केवळ दोनच किनारे पर्यटनासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले. मुंबईतील १२ पैकी गिरगाव चौपाटी आणि जुहू चौपाटी पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित असल्याचे शासननिर्णय आणि महापालिकेच्या नोंदीवरून स्पष्ट झाले आहे. गिरगाव चौपाटी सार्वजनिक पोहण्यासाठी आणि जलक्रीडेसाठी सुरक्षित क्षेत्र मानले जाते. तर जुहू चौपाटीवरील वायसीएमए ते रुइया पार्कदरम्यानचा भाग पोहण्यासाठी सुरक्षित मानला जातो. स्थानिक, तसेच देश-विदेशांतील पर्यटक मोठ्या संख्येने या धोकादायक समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटनासाठी जात असल्याचे उघड झाले आहे. मुंबई महानगरपालिका, अग्निशमन दल, पोलीस दलासमोरील आव्हान वाढले आहे. दरम्यान, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी मुंबई अग्निशमन दलाने सहा समुद्रकिनाऱ्यांवर १११ जीवरक्षक तैनात केले आहेत. गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राइव्हसह इतर समुद्रकिनाऱ्यांची पर्यटकांना ओढ असते. मोठ्या संख्येने पर्यटक मुंबईतील पर्यटनस्थळांना भेट देत असतात. मुंबईला सुमारे १२ समुद्रकिनारे (चौपाट्या) आहेत. गिरगाव, वाळकेश्वर-वरळी, दादर, माहीम, वांद्रे ते खार, जुहू, आक्सा (दानापानी), मनोरी, गोराई, मार्वे, टाटा गार्डन बी. डी. रोड आणि राजभवन या १२ ठिकाणी समुद्रकिनारे लाभले आहेत. मात्र १२ पैकी केवळ दोन समुद्रकिनारे पर्यटकांच्या दृष्टीने सुरक्षित आहेत. राजभवन किनारा सुरक्षिततेच्या दृष्टीने पर्यटकांसाठी प्रतिबंधित क्षेत्र आहे. तर टाटा गार्डन बी. डी. रोड किनाऱ्यावर पर्यटकांची संख्या कमी आहे. वाळकेश्वर-वरळी, दादर, माहीम, वांद्रे ते खार, आक्सा (दानापानी), मनोरी, मार्वे आणि गोराई या समुद्रकिनारपट्ट्या धोकादायक श्रेणीत आहेत. वाळकेश्वर-वरळी किनारपट्टी खडकाळ, दादर किनारपट्टी खडकाळ आणि प्रदूषणयुक्त पाण्यामुळे असुरक्षित आहे. माहीम किनारपट्टी जलनिस्सारणामुळे, तर वांद्रे ते खारदरम्यानची किनारपट्टी खडकाळ असल्याने असुरक्षित आहे. आक्सा (दानापानी) अतिजलद प्रवाह, मार्वेमध्ये पाण्याखाली जलद प्रवाह असल्याने, तर मनोरी आणि गोराई किनारपट्ट्या जलद खळखळणाऱ्या पाण्यामुळे असुरक्षित आहेत.



## चार नवीन स्मशानभूमींसाठी पनवेल महापालिकेचा १० कोटींचा निधी

■ पनवेल: यश सावंत

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये तळोजा वसाहतीमध्ये दोन ठिकाणी, कोयनावेळे आणि घोट या चार ठिकाणी नवीन स्मशानभूमीचे बांधकाम पालिका प्रशासन करणार आहे. यासाठी पालिका १०.६८ लाख रुपये खर्च करणार आहे. नुकतीच याबाबतची निविदा जाहीर करण्यात आली. तळोजा वसाहतीमध्ये हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मातील नागरिकांसाठी स्मशानभूमीसाठी विविध राजकीय पक्षांना जनआंदोलने उभारावी लागली. पालिका प्रशासनाने



सिडको मंडळाकडून संबंधित भूखंडाचे हस्तांतरण झाल्यानंतर हे भूखंड ताब्यात घेऊन त्यावर विकासकामांची सुरुवात केली आहे. तळोजा फेज एक येथील सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक १० वरील १४९९.५३ चौरस मीटर क्षेत्र, तळोजा फेज २ मध्ये ५७८ चौरस मीटरचा भूखंड, कोयनावेळे येथील १२६१ चौरस मीटरचा भूखंड आणि घोट येथील ५७६.५३ चौरस मीटर भूखंडावर पालिका स्मशानभूमीसाठी बांधकाम करणार आहे. पालिकेच्या बांधकाम विभागाने यासाठी १० कोटी ६८ लाख १६ हजार रुपयांची निविदा जाहीर केली आहे.

## कोकणातील BSNL ची सेवा गतिमान करा; नारायण राणे यांची दूरसंचार मंत्र्यांकडे मागणी

■ सिंधुदुर्ग : आकांक्षा नार्वेकर

जिल्ह्यातील बीएसएनएलच्या सेवा वाढण्या बरोबरच सेवेत सुधारणा करण्याची मागणी माजी केंद्रीय मंत्री खासदार नारायण राणे यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे केली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ४ जी सेवेला मोठी मागणी आहे. मात्र १५० मंजूर ४ जी टॉवरपैकी ८७ टॉवरचे काम पूर्ण झाले असून फक्त १० टॉवर ४ जी सेवा देत आहेत.याकडे खा.राणे यांनी मंत्र्याचे लक्ष वेधले. यावेळी बीएसएनएल सेवा कोकणात अधीक मजबुत करण्यासाठी तातडीने प्रयत्न करु,संबधीतांना सुचना देण्यात येतील असे मंत्र्यांनी सांगितले. दूरसंचार मंत्री यांना खा. नारायण राणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, मी महाराष्ट्रातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचे लोकसभेत प्रतिनिधीत्व करत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात डोंगराळ आणि कठीण प्रदेशांचा समावेश आहे. या जिल्ह्यात चांगली सेवा देणारी बीएसएनएल ही एकमेव मोबाईल कंपनी आहे. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्रातील सर्वाधिक महसूल मिळवणारा जिल्हा आहे. मात्र, मनुष्यबळ आणि निधीअभावी सेवेत अनेक त्रुटी आहेत. मंजूर १५०-४ जी टॉवरपैकी ८७ चे काम पूर्ण झाले असून फक्त १० टॉवर ४ जी सेवा देत आहेत.




जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ४ जी सेवेला मोठी मागणी आहे, मात्र मनुष्यबळ आणि निधीअभावी ती पूर्ण करता येत नाही. केबल बिघाडामुळे किंवा इतर कारणांमुळे सेवा खंडित झाल्यास मनुष्यबळाच्या अभावी उपस्थित राहता येत नाही. बीएसएनएल वापरकर्त्यांनी सेवेच्या गतीबद्दल तक्रारी केल्या आहेत. केबलच्या देखभालीसाठी नेमलेला विक्रेता आपले काम व्यवस्थित करत नसल्याच्या तक्रारी आहेत. कृपया संबंधितांना सेवेत सुधारणा करण्यासाठी, बीएसएनएल सिंधुदुर्गासाठी मनुष्यबळ आणि निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात. अशी मागणी खा.नारायण राणे यांनी केली आहे.

## नीलकमल बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र अखेर निलंबित, मुंबई सागरी मंडळाची कडक कारवाई

■ मुंबई : सम्यक कासारे

गेट वे ऑफ इंडिया येथून घारापुरीला जाणाऱ्या 'नीलकमल' बोटीला बुधवारी झालेल्या अपघाताच्या चौकशीअंतर्गत बोटीतून क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करीत असल्याचे स्पष्ट झाले. याची गंभीर दखल घेत मुंबई सागरी मंडळाने अखेर आता 'नीलकमल' बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र निलंबित नौदलाच्या बोटीने धडक दिल्याने अपघात झाला. मात्र 'नीलकमल' बोटीवरील कर्मचाऱ्यांकडून प्रवासी वाहतुकीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन झाल्याची माहिती सागरी मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. 'नीलकमल' बोटीची प्रवासी क्षमता ८० प्रवासी आणि सहा कर्मचारी अशी होती. असे असताना या बोटीवर अपघातादरम्यान एकूण ११० प्रवासी आणि ५ कर्मचारी



केले आहे. तसेच बोटीतील डेकची जबाबदारी असणाऱ्या बोट मास्टर आणि इंजिनची जबाबदारी असणाऱ्या इंजिन ड्रायव्हरची चौकशी सध्या सुरू आहे. यांच्यावरही क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेतल्याचा ठपका असून चौकशीअंती या दोघांविरोधातही कडक कारवाई करून त्यांचा परवाना प्रमाणपत्र निलंबित करण्याचे संकेत सागरी मंडळाने दिले आहेत.

घारापुरीजवळ प्रवासी बोटीवर नौदलाची स्पीड बोट आदळून बुधवार झालेल्या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. यामुळे जलवाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'नीलकमल' बोटीला असल्याचे स्पष्ट झाल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. ही बाब गंभीर असल्याने नीलकमल बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र बुधवारी निलंबित करण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणत्याही बोटीवरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी ही तिन्ही प्रमाणपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. ही तिन्ही प्रमाणपत्रे रद्द झाल्याने 'नीलकमल' बोटी, मालकाविरोधातील ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे. या कारवाईमुळे जलवाहतुकीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चपराक बसेल, असेही म्हटले जाता आहे.

## येरवडा कारागृहात आधुनिक बायोमेट्रिक प्रणाली, पॅनिक अलार्म आणि संबोधन यंत्रणा सुरू

■ पुणे : अभिजीत येरल्लू

तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेचे आधुनिकीकरण योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षात अत्याधुनिक प्रणाली सुरू करण्यात आली. कारागृहातून कैद्याने पलायन करू नये, तसेच या कैद्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून आता अद्ययावत प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात येरवडा मध्यवर्ती आणि महिला कारागृहात बायोमेट्रिक, पॅनिक अलार्म आणि सार्वजनिक संबोधन प्रणाली बसविण्यात आली आहे. हरियाणातील गुरुग्राम येथील इन्व्हेडर टेक्नॉलॉजीज कंपनीमार्फत ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन विशेष पोलिस महानिरीक्षक (कारागृह) डॉ. जालिंदर सुपेकर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. पोलिस महासंचालक व महानिरीक्षक (कारागृह व सुधारसेवा) प्रशांत बुरडे, डॉ. जालिंदर सुपेकर आणि कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रणाली




कार्यान्वित करण्यात आली. ही प्रणाली टप्प्याटप्प्याने राज्यातील इतर कारागृहांमध्येही कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ, इन्व्हेडर टेक्नॉलॉजीज कंपनीचे शशांक मिश्रा, अतिरिक्त अधीक्षक पल्लवी कदम, उपअधीक्षक डॉ. बी. एन. ढोले, आर. ई. गायकवाड, वरिष्ठ तुरुंगाधिकारी ए. एस. कांदे, तुरुंगाधिकारी शिवाजी पाटील, सी. आर. सांगळे यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी, कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

असा होणार फायदा

१) बायोमेट्रिक प्रणाली
- कारागृहात नियंत्रित प्रवेश बंदी, कर्मचारी आणि अभ्यांगतांच्या हालचालींवर लक्ष
- कारागृहात केवळ अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश
- कैद्यांचे पलायन टाळण्यासाठी त्यांच्या हालचालींवर लक्ष
- कारागृहात भेटीसाठी येणाऱ्या अभ्यांगतांचे स्क्रिनिंग होणार

२) पॅनिक अलार्म बटण
- आपत्कालीन परिस्थितीला जलद प्रतिसाद देण्यासाठी पॅनिक अलार्म बटणाचा वापर
- दंगल किंवा हिंसाचारावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांना सतर्क करण्यासाठी पॅनिक बटण
- कैद्यांना वैद्यकीय मदतीसाठी तातडीने सूचना पाठविण्याची सुविधा
- कैद्यांकडून पलायनाचा प्रयत्न किंवा इतर अनुचित प्रकार वेळेत रोखता येणार
- सायलेंट अलार्म प्रणालीमुळे अधिकाऱ्यांना गुप्त सूचना मिळणार

३) सार्वजनिक संबोधन प्रणाली
- कारागृहामध्ये प्रभावी संवाद, सुरक्षा आणि व्यवस्थापन
- अधिकाऱ्यांना घोषणा करण्यास आणि कैद्यांच्या वर्तनावर लक्ष

## कल्याणमध्ये भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यावर प्राणघातक हल्ला, आरोपींच्या तात्काळ अटकेसाठी भाजपचा आंदोलनाचा इशारा

■ कल्याण : आकाश कांबळे

येथील पश्चिमेतील पारनाका भागात शुक्रवारी रात्री बारा वाजताच्या दरम्यान भाजपच्या एका ६४ वर्षाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी प्राणघातक हल्ला केला. लाथाबुक्की, पेव्हर ब्लॉकने मारहाण झाल्याने ज्येष्ठ कार्यकर्ता गंभीर जखमी झाले आहेत. हेमंत रघुनाथ परांजपे असे प्राणघातक हल्ला झालेल्या कार्यकर्त्याचे नाव आहे. ते सेवानिवृत्त आहेत. ते कल्याणमधील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. या मारहाणीवरून भाजप कल्याण विभागाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. हेमंत परांजपे यांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, शुक्रवारी रात्री आपण महेश जाधव यांच्या नातेवाईकाच्या लग्नाला गेलो होतो. तेथून प्रशांत देशमुख यांनी त्यांच्या मोटारीने आपणास दोन जणांना आपल्याला पारनाका येथील घरी सोडण्यास सांगितले. शुक्रवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास आपण



घराजवळ उतरलो. घराजवळ उभा असताना अचानक दोन व्यक्ति तेथे स्कुटरवर आल्या. त्यांचे चेहरे रुमालाने झाकले होते. दोन्ही अज्ञात इसमांनी आपणास, 'काय रे लय माजलास काय. आमच्या दादाला शिव्या देतो काय. काही पण बोलतोस काय,' असे बोलून दोघांनी आपणास शिवीगाळ करत ठोशाबुक्क्यांनी मारहाण करत जमिनीवर पाडले.

## आरक्षणातंर्गत प्रथमच पाच अनाथ मुले बनली पोलीस उपनिरीक्षक; तर्पण फाउंडेशनच्या पालकत्वाचे फलित

■ नाशिक : सतिश सोनावणे

बालगृहातून बाहेर पडणाऱ्या १८ वर्षापुढील अनाथ मुलांचे पालकत्व स्वीकारून तर्पण फाउंडेशनने दाखविलेली दिशा आणि शासनाने अनाथ बालकांसाठी दिलेले आरक्षण, याचा एकत्रित परिणाम २० डिसेंबर ला महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीच्या दीक्षांत सोहळ्यात पहावयास मिळाला. या आरक्षणातंर्गत प्रथमच पाच अनाथ मुले पोलीस उपनिरीक्षक झाले. हा दिवस संबंधित मुलांसह त्यांचे पालकत्व स्वीकारणारे तर्पण फाउंडेशनचे प्रमुख भाजपचे आमदार श्रीकांत भारतीय आणि त्यांची पत्नी श्रेया भारतीय यांच्यासाठी जणू सोनियाचा ठरला. महाराष्ट्र पोलीस अकादमीत झालेल्या दीक्षांत सोहळ्यास मुलांचे पालक म्हणून भारतीय दाम्पत्य उपस्थित होते. फाउंडेशनची अभय तेली, सुधीर चौघुले आणि अमोल मांडवे ही तीन मुलगे आणि जया सोनटक्के, सुंदरी जयस्वाल या दोन मुली पोलीस उपनिरीक्षक झाल्या. महत्वाची बाब म्हणजे प्रशिक्षणात अभय तेली यांनी उत्कृष्ट कामगिरीबद्दल तीन बक्षीसे मिळवली. अनाथ, निराधार बालकांना बालगृहात प्रवेश दिला जातो. शून्य ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवास, शिक्षण सुविधा दिल्या जातात. अनाथ मुलांचा त्यांच्या संस्थेतील कालावधी संपल्यानंतर (१८ वर्षानंतर) अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या भावी आयुष्यात अडचणी निर्माण होतात. कोणतीही कागदपत्रे नसल्याने त्यांना



जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही. परिणामी, विविध शासकीय सवलतींपासून ते वंचित राहतात. आमदार भारतीय यांनी ही बाब सरकारसमोर मांडली होती. तत्कालीन फडणवीस सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत अनाथ मुलांना शिक्षण आणि नोकरीत एक टक्का समांतर आरक्षण लागू केले. या निर्णयामुळे अनाथ मुलांना शासकीय सेवेत संधी मिळाली. आजवर फाउंडेशनची ८० मुले शासकीय सेवेत रुजू झाली. अनाथ बालके १८ वर्षानंतर बालगृहातून बाहेर पडतात. त्यांची बौद्धिक क्षमता आणि मानसिक चाचणी घेऊन फाउंडेशन पुढील शिक्षण, निवास व भोजनाची जबाबदारी स्वीकारते. तर्पण फाउंडेशनने राज्यात १२६१ अनाथ बालकांचे पालकत्व स्वीकारले असल्याचे आमदार भारतीय यांनी सांगितले.

## मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आठपदरीकरण: आठपदरीकरणाच्या प्रस्तावास राज्य सरकारच्या मान्यतेची प्रतीक्षा

■ मुंबई : नितीन देवळेकर

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करून महामार्गाची क्षमता वाढवून हा मार्ग अधिक सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे आठपदरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव एमएसआरडीसीकडून फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. मात्र अद्याप या प्रस्तावास मंजुरी मिळाली नसल्याने आठपदरीकरण रेंगाळले आहे. त्यामुळे आता एमएसआरडीसीला या प्रस्तावाच्या मान्यतेची प्रतीक्षा आहे.

एमएसआरडीसीकडून ९४.५ किमीचा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग २००२ मध्ये पूर्णतः वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या महामार्गामुळे चार ते पाच तासांचा मुंबई-पुणे प्रवास दोन ते अडीच तासांवर आला. सध्या



राज्यातील सर्वात महत्त्वाचा आणि वर्दळीचा असा हा महामार्ग मानला जातो. दररोज त्यावरून अंदाजे एक लाख ५५ हजार वाहने धावतात. मात्र आता हा महामार्ग अपुरा पडू लागला आहे. भविष्यात वाहनांची संख्या आणखी वाढणार आहे. अशावेळी सहा पदरी महामार्गाचे आठपदरीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे. वाहन संख्या प्रचंड वाढल्याने महामार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला आहे. अपघातांची भीती वाढली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता एमएसआरडीसीने महामार्गाच्या आठपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार फेब्रुवारी २०२४ ला आठपदरीकरणाचा सविस्तर प्रस्ताव एमएसआरडीसीकडून राज्य सरकारकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला. मात्र अद्याप त्या प्रस्तावाला मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे प्रकल्पास विलंब होत आहे. या प्रस्तावास केव्हा मान्यता मिळते याची प्रतीक्षा एमएसआरडीसीला आहे. मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ आठपदरीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. दरम्यान या प्रकल्पासाठी ६०८० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पासाठीचा निधी उभारण्यासाठी एमएसआरडीसीने आठपदरीकरणाच्या प्रस्तावाअंतर्गत एक फायनान्शियल मॉडेलही तयार केले आहे.

## अभ्युदयनगर पुनर्विकासाच्या निविदेला ३० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई : विशाल कारंडे

काळाचौकी येथील अभ्युदनगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून सध्या निविदा प्रक्रिया सुरु आहे. या निविदा प्रक्रियेस अखेर आता ३० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अभ्युदय नगर वसाहतीचा रखडलेला पुनर्विकास मुंबई मंडळाच्या माध्यमातून मार्गी लावला जात आहे. ३३ एकर जागेवरील ४९ इमारतींच्या पुनर्विकासाअंतर्गत ३३५० कुटुंबांना अंदाजे ६३५ चौ. फुटाचे घर दिले जाणार आहे. मोतीलाल नगरच्या धर्तीवर कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेन्ट एजन्सीची अर्थात खासगी विकासकाची नियुक्ती करत म्हाडाच्या माध्यमातून हा पुनर्विकास केला जाणार




आहे. या पुनर्विकासातून मुंबई मंडळाला ४० हजार चौ.मीटर क्षेत्रफळ आणि सुमारे ८०० कोटींचा महसूल मिळण्याची शक्यता आहे. अशा या पुनर्विकासासाठी मंडळाने विधानसभेची आचारसंहिता लागू होण्याआधी १० ऑक्टोबरला निविदा प्रसिद्ध केली होती. निविदेप्रमाणे २२ नोव्हेंबरला निविदा सादर करण्याची अंतिम तारीख होती. मात्र आचारसंहिता, निवडणुकीची धामधूम लक्षात घेता निविदेला मुदतवाढ देण्यात आली होती. हि मुदतवाढ शुक्रवार संपुष्टात आली असली असून ही मुदत संपुष्टात येण्याआधीच निविदेला मुदतवाढ देण्यात आली आहे. ३० डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.